७० वर्ष

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी २०२६

www.dainikesandhya.com   www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०५० | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## फरार आर्थिक गुन्हेगार विजय मल्ल्या भारतात परतणार?

मुंबई (दै. संध्या) : भारताचा फरार आर्थिक गुन्हेगार विजय मल्ल्याची थेट मुंबई उच्च न्यायालयाने कानउघडणी केली आहे. याचसोबत भारतात परतण्यासाठी विजय मल्ल्याला शेवटची संधी देण्यात आली आहे. तसेच फ्युजिटीव्ह इकनॉमिक ऑफेंडर कायद्याच्या तरतुदींना आव्हान देणारी याचिका प्रलंबित असल्याचा फायदा घेत देशातील तसेच यूनायटेड किंगडममधील न्यायालयीन प्रक्रियेपासून दूर राहता येणार नसल्याचेही मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. आता विजय मल्ल्याला शेवटची संधी देत त्याने भारतात परतणार की नाही हे स्पष्ट करावे अन्यथा त्यांची याचिका ऐकली जाणार नसल्याचेही न्यायालयाने म्हटले आहे. विजय मल्ल्याला बजावताना मुंबई उच्च न्यायालयाने म्हटले की, तुम्हाला परत यावेच लागेल. तुम्ही परत येऊ शकत नसाल, तर आम्ही तुमची याचिका ऐकू शकत नाही असे स्पष्ट करत तुम्ही न्यायालयीन प्रक्रियेपासून दूर पळत आहात. त्यामुळे तुम्हाला या कार्यवाहीचा लाभ घेता येणार नाही. मात्र, तुमच्याशी न्याय राखत आम्ही ही याचिका फेटाळत नाही.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

## काँग्रेसचे अनिल रावळ यांना हार्ट अटॅक

कोल्हापूर (दै. संध्या) : कोल्हापूरमध्ये काँग्रेसच्या विरोधी पक्षनेता निवडीसाठी बैठक बोलावण्यात आलेली होती. बैठक सुरु असतानाच सभागृहाच्या बाहेर नगरसेवक राजू लाटकर यांचे समर्थक अनिल रावळ यांना हृदयविकाराचा धक्का बसला. सर्वांनी धावपळ करीत त्यांना रुग्णालयात नेलं, मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. कोल्हापूरच्या महापौरपदी रूपाराणी निकम यांची निवड झाल्यानंतर बुधवारी सायंकाळी काँग्रेस पक्षाच्या वतीने अभिनंदन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. याच बैठकीत काँग्रेसचे नगरसेवक राजेश लाटकर यांच्या विरोधी पक्षनेतेपदासाठी पत्र देण्याचा कार्यक्रम छत्रपती ताराराणी सभागृहात सुरू होता. या बैठकीदरम्यान एक एक दुर्दैवी घटना घडली आणि आनंदाच्या वातावरणावर शोककळा पसरली. बैठक सुरू असतानाच सभागृहाच्या बाहेर काँग्रेसचे नगरसेवक राजू लाटकर यांचे समर्थक अनिल रावळ हे उपस्थित होते. अचानक त्यांची प्रकृती बिघडल्याची माहिती मिळताच सभागृहात एकच धावपळ उडाली.

## अजित पवार कारनेच जाणार होते

मुंबई (दै. संध्या) : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने संपूर्ण राज्यात हळहळ व्यक्त केली गेली. अजूनही अजित पवार आपल्यात नाहीत यावर कोणाचा विश्वास देखील बसत नाही. त्यात त्यांच्या विमान अपघातावरून अनेकांकडून तर्क-वितर्क लावले जात आहेत. आता राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव यांनी एक धक्कादायक माहिती दिली आहे. अजित पवार अपघाताच्या आदल्या दिवशी कारने बारामतीला जाणार होते. त्यासाठी सर्व तयारीही झाली होती. परंतु, आयत्या वेळेस एक महत्त्वाचे काम घेऊन प्रफुल्ल पटेल आले, त्या कामाला बराच वेळ लागला आणि अजितदादा कार ऐवजी दुसऱ्या दिवशी विमानाने बारामतीकडे रवाना झाले. त्याच विमानाला अपघात झाला आणि आपण अजितदादांना गमावले, अशी धक्कादायक माहिती प्रमोद हिंदुराव यांनी दिली आहे. राष्ट्रवादीचे माजी आमदार जगन्नाथ शिंदे यांच्या पुढाकाराने अजित पवारांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन मंगेशी बँक्वेट सभागृहात करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

# सुनेत्रा पवारांची पुण्यासाठी पहिलीच डीपीसी बैठक

### १ हजार ३२ कोटींच्या विकासकामांना मंजुरी



**मुंबई (दै. संध्या)**

पुणे जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ साठी शासनाने प्रस्तावित केलेल्या १ हजार ३२.८८ कोटी रुपयांच्या वित्तीय मर्यादेच्या प्रारूप आराखड्यास जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली, यामध्ये प्रामुख्याने ग्रामीण, परिवहन विकास, अपारंपारिक ऊर्जा व उर्जा, हरीत महाराष्ट्र, नागरी क्षेत्र व आरोग्य पायाभूत सुविधा, महिला व बालकांचे सशक्तीकरण, गतिमान प्रशासन, कौशल्यपुर्ण रोजगार निर्मिती, शैक्षणिक दर्जा वाढीसाठी पायाभूत सुविधा आणि क्रीडा व कलागुणांचा विकासावर भर देण्यात आला आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिली.

विधानभवन येथील झुंबर हॉलमध्ये आयोजित बैठकीत त्यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे मार्गदर्शन केले. यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार अमित गोरखे, भीमराव तापकीर, राहुल कुल, सिद्धार्थ शिरोळे, बापूसाहेब पठारे, बाबाजी काळे, शंकर मांडेकर, हेमंत रासणे, सुनील शेळके, शंकर जगताप, पुणे शहराच्या महापौर मंजुषा नागपुरे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, पीएमआरडीएचे मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश म्हसे, पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., पिंपरी-चिंचवडचे पोलीस सहआयुक्त शशिकांत महावरकर, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता राजेंद्र राहणे, अधीक्षक अभियंता भरतकुमार बाविस्कर, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर आदी उपस्थित होते.

तसेच उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, खासदार सुप्रिया सुळे, डॉ. अमोल कोल्हे, आमदार शरद सोनवणे, पालक सचिव व्ही. राधा, उपमुख्यमंत्री यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख व पुणे शहराचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार हे दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या की, सन २०२६-२७ च्या प्रस्तावित प्रारूप आराखड्यात मुख्यत्वाने ग्रामीण विकासासाठी १३५ कोटी रुपये, परिवहन विकासासाठी ११५ कोटी रुपये, नागरी क्षेत्रातील पायाभूत सुविधांसाठी ११६.२५ कोटी रुपये, अपारंपारिक ऊर्जा व उर्जा विकासासाठी ८० कोटी रुपये तसेच पर्यटन विकासासाठी ५६.८६ कोटी रुपये, हरीत महाराष्ट्राकरिता ४० कोटी रुपये, आरोग्य पायाभूत सुविधांचा विकासकरिता ११०.७१ कोटी रुपये, महिला व बालकांचे सशक्तीकरण २९.४४ कोटी रुपये, गतिमान प्रशासन ७८.५० कोटी रुपये, कौशल्यपुर्ण रोजगार निर्मिती १०.५ कोटी रुपये, शैक्षणिक दर्जा वाढीसाठी पायाभूत सुविधांवर भर १०० कोटी रुपये, क्रीडा व कलागुणांचा विकासाकरिता १०.१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

सन २०२६-२७ साठी शासनाने १ हजार ३२.८८ कोटी रुपयांची वित्तीय मर्यादा निश्चित केली असली तरी विविध विभागांकडून एकूण ३ हजार १२८ कोटी रुपयांच्या मागण्या प्राप्त झाल्या आहेत. त्या मागण्यांची छाननी करून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक व प्राधान्यक्रमातील प्रकल्पांचा समावेश करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी सादरीकरणाद्वारे सन २०२५-२६ मधील खर्चाचा आढावा सादर केला. तसेच सन २०२६-२७ च्या प्रस्तावित प्रारूप आराखड्यात प्रामुख्याने कृषी विकास दरात व दरडोई कृषी उत्पन्नात वद्धी करण्याकरिता कृषी पुरक असणाऱ्या संलग्न क्षेत्रांच्या योजना, रास्त दर, निकोप स्पर्धा, सर्वांकरिता खुली बाजारपेठ, जलसंधारण व मृदसंधारणाची कामे, भुगर्भ पाणीसाठ्यात वाढीकरिता उपाययोजना यावर भर देण्यात आला आहे. बैठकीत उपस्थित मंत्री, खासदार व आमदार यांनी विविध विकासकामांबाबत सूचना मांडल्या. बैठकीस विविध कार्यान्वयन यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## शासकीय रुग्णालयांतील तपासण्या, उपचार विनामूल्यच

**मुंबई (दै. संध्या)**



शासकीय रुग्णालयांमध्ये तपासण्या व उपचारांसाठी शुल्क आकारले जाणार असल्याची चर्चा सुरू असतानाच राज्य आरोग्य विभागाने सोमवारी सुधारित शुद्धीपत्रक जारी करून गैरसमज दूर केला आहे. शासकीय रुग्णालयांमधील सर्व तपासण्या व उपचारपूर्वीप्रमाणे मोफतच राहतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे. १६ जानेवारी रोजी जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयाबरोबर जोडलेले दरपत्रक (परिशिष्ट) रद्द करण्यात आल्याची माहितीही विभागाने दिली. आरोग्य विभागाने प्रसिद्धीपत्रक काढून स्पष्ट केले की, जानेवारी १६ च्या शासन निर्णयात तांत्रिक त्रुटीमुळे जुन्या दरांचा समावेश झाला होता. प्रत्यक्षात ऑगस्ट २०२३ मधील शासन निर्णयानुसार शासकीय रुग्णालयांतील तपासण्या व उपचार सेवा मोफतच ठेवण्यात आल्या आहेत. मात्र नव्या नागरिक सनदेत चुकून ६ जून २०१५ च्या जुन्या शासन निर्णयातील दरांचा उल्लेख करण्यात आला होता. या दरपत्रकात बाह्यरुग्ण नोंदणीपासून ते मोठ्या शस्त्रक्रियांपर्यंत विविध सेवांसाठी शुल्क नमूद करण्यात आले होते.

## पारंपरिक ‘मारामारी’ने श्रीक्षेत्र वीर यात्रेची उत्साहात सांगता : ‘सवाई सर्जाचा’ जयघोष

**सासवड (दै. संध्या)**



श्रीनाथ म्हस्कोबा आणि देवी जोगेश्वरी यांच्या विवाह सोहळ्याने प्रारंभ झालेल्या पुरंदर तालुक्यातील श्री क्षेत्र वीर येथील ऐतिहासिक बारा दिवसांच्या यात्रेची सांगता गुरुवारी अत्यंत उत्साहात झाली. मानाच्या पालख्या, २० गावांच्या मानाच्या काठ्या आणि 'सवाई सर्जाच्या' जयघोषात गुलालाची आणि रंगांची उधळण करत पारंपरिक 'मारामारी' (रंगाचे शिंपण) सोहळ्याने या उत्सवाची सांगता करण्यात आली.

यात्रेचा मुख्य आकर्षण असलेला माघ वद्य दशमीचा मारामारीचा सोहळा दुपारी रंगला. त्यापूर्वी मंदिराला पालख्यांनी प्रदक्षिणा पूर्ण केल्यानंतर दगडी कासवावर बसून तात्याबा बुरुंगले आणि दादा बुरुंगले यांनी वार्षिक पिक पाण्याबाबतची भाकणूक (भविष्यवाणी) वर्तवली. मृग नक्षत्राचे पाणी तीन खंडात पडेल. आश्लेषा-मघा दोन खंडात, तर उत्तरा-पूर्वा चार खंडात पडेल.पावसाचे प्रमाण समाधानकारक असल्याने शेतकरी सुखी होईल. गाई-गुरांवरील रोगराई हटली असून मानवी आरोग्यासाठी थोडा आटापिटा राहील अशी भविष्यावाणी झाली आणि सवाई सर्जाचं चांगभलच्या जयघोषाने परीसर दणाणून गेला.

भविष्यवाणीनंतर दुपारी दीडच्या सुमारास देवाचे मानकरी समस्त जमदाडे परिवाराच्या हस्ते श्रीनाथ म्हस्कोबा व जोगेश्वरी मातेच्या मूर्तींना नैवेद्य दाखवून रंगाचे शिंपन करण्यात आले. यावेळी कोडीत, कनेरी, वाई, सोनवडी, भोडवेवाडी आणि कसबा पेठ (पुणे) येथील मानाच्या पालख्यांसह २० गावांच्या मानाच्या काठ्यांनी मंदिर परिसर दुमदुमून गेला होता.

यात्रेसाठी महाराष्ट्रभरातून लाखो भाविक दाखल झाले होते. भाविकांच्या सोयीसाठी, पिण्याचे शुद्ध पाणी, दर्शन रांगा आणि तीन भव्य वाहनतळ., महिलांसाठी विशेष 'जोगेश्वरी कक्ष', सासवड पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त आणि स्वयंसेवकांचे परिश्रम. मंदीर आणि परीसरात आकर्षक विद्युत रोषणाई आणि फुलांची सजावट करण्यात आली होती. या सोहळ्यासाठी देवस्थानचे सर्व विश्वस्त, सल्लागार मंडळ, ग्रामपंचायत सदस्य आणि शासकीय अधिकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

## महापालिका निवडणुकांतील वाद, युवकावर रात्री ११ वाजता झाडल्या गोळ्या

**अहिल्यानगर (दै. संध्या)**



राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका किरकोळ वादाशिवाय सुरळीतपणे पार पडल्या. मात्र, महापालिका निवडणुकांवेळी काही ठिकाणी खुनाच्या घटना घडल्याने निवडणुकांमधील राजकीय वाद पुन्हा एकदा आव्हान बनल्याचं दिसून आलं. अहिल्यानगर महापालिकेच्या निवडणुकीत झालेल्या वादाचे पडसाद थेट आता गोळीबार करण्यापर्यंत उमटल्याचं दिसून आलं. येथील अबरार शेख या युवकावर नगरमधील राज चेंबर याठिकाणी गोळीबार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेनंतर मित्र आणि स्थानिकांच्या मदतीने अबरारला रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे.

अबरार शेख याला मनपा निवडणुकीच्या वेळेस किरकोळ कारणातून मारहाण करण्यात आली होती. त्यावेळी अबरारने पोलिसांमध्ये तक्रारही दाखल केली. त्याचा राग मनात धरून अबरार शेख याच्यावर काल रात्री 11 वाजताच्या सुमारास चार गोळ्या झाडण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे. महापालिका निवडणुकीच्या वादातूनच हा गोळीबार झाला असावा असा संशय व्यक्त होत आहे. मात्र, पोलीस तपासातच घटनेचं सत्य समोर येणार आहे. अबरार शेख याच्या कंबरेत गोळी लागल्याने अबरार शेख गंभीर जखमी झाला, त्याला उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, अतिरिक्त पोलीस महासंचालक कृष्ण प्रकाश सध्या अहिल्यानगर जिल्ह्यात पोलिसांच्या वार्षिक तपासणी दौऱ्यावर असताना ही घटना घडल्याने पोलिस प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाला. याप्रकरणी, पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.

अहिल्यानगरच्या श्रीरामपूर येथे अल्पवयीन मुलींसोबत गैरवर्तन करण्याच्या प्रकरणातील आरोपीवर न्यायालयात हल्ला झाल्याची घटना समोर आली. श्रीरामपूर न्यायालयाबाहेर संतप्त महिलांनी आरोपीवर हल्ला केला. न्यायालयात हजर करण्यासाठी आरोपीला घेऊन जात असताना हा प्रकार घडला. अल्पवयीन मुलींसोबत असभ्य वर्तन करणाऱ्या आरोपी सचिन गोणारकर यास महिलांनी चोप दिला. प्राथमिक शाळेतील चार चिमुकल्या मुलींवर अत्याचार करण्याच्या प्रकरणातील गोणारकर हा आरोपी आहे. आरोपीला आमच्या ताब्यात द्या, आम्ही शिक्षा देतो अशा संतप्त प्रतिक्रिया महिला पालकांनी यावेळी दिल्या.

## हर्षवर्धन सपकाळ म्हणाले,सुधीरभाऊंचा बंगला १000 कोटीचा

**चंद्रपूर (दै. संध्या)**



राज्याचं लक्ष लागलेल्या चंद्रपूर महापालिकेत काँग्रेसच्या धरसोड वृत्तीमुळे अखेर भाजपचा महापौर विराजमान झाला. ठाकरेंच्या शिवसेनेनं येथे काँग्रेसऐवजी भाजपला साथ देत भाजपचा महापौर केला, तर शिवसेनेला उपमहापौरपदाची संधी मिळाली. त्यावरुन, आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी सुरू झाल्या आहेत. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांच्यावर गंभीर आरोप करत मोठा घोडेबाजार चंद्रपूर महापालिकेत झाल्याचे म्हटले. तसेच, चंद्रपुरात सुधीर मुनगंटीवारांचा बंगला तब्बल 1000 कोटींचा असल्याचेही त्यांनी म्हटले होते. आता, सुधीर मुनगंटीवार यांनी सपकाळांच्या टीकेला प्रत्युत्तर दिलंय. माझं घर महाग असेल तर त्यांनी कार्यालयासाठी विकत घ्यावं, त्यांनी जो आकडा सांगितला, त्यातल्या किती टक्क्यात घ्यायचं आहे ते सांगावं, असे म्हणत घर विकत घेण्याची ऑफरच सुधीर मुनगंटीवार यांनी दिलीय. खरंतर काँग्रेसला असेच प्रदेशाध्यक्ष लाभले पाहिजे जे बेताल बोलतात, माझं त्यांना ओपन चॅलेंज आहे की तुम्ही कितीला घर विकत घेता, तेवढाच मला फायदा होईल, असेही मुनगंटीवार यांनी म्हटलं.

# स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून महाराष्ट्राचे होणार वेगाने परिवर्तन – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस


### टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशन सोबतच्या करारांमुळे वेगवेगळ्या क्षेत्रातील विकास महाराष्ट्रभर पोहोचविणार

**मुंबई (दै. संध्या)**

महाराष्ट्र विविध क्षेत्रांसह देशाच्या प्रगतीमध्ये वेगळा ठसा उमटवीत आहे. राज्याच्या प्रगतीचा वेग असाच कायम ठेवून राज्य शासनाच्या विविध स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून महाराष्ट्राचे वेगाने परिवर्तन होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशन सोबत करण्यात आलेल्या करारावेळी व्यक्त केला. टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशन सोबत झालेल्या करारामुळे वेगवेगळ्या क्षेत्रातील विकास संपूर्ण महाराष्ट्रभर पोहचविणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, मृदा व जलसंधारण मंत्री संजय राठोड, महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर – साकोरे उपस्थित होत्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यातील प्रत्येक कुटुंबासाठी आरोग्य, पोषण, पाणी सुरक्षा आणि उपजीविका सुधारणे याला शासनाचे प्राधान्य आहे. या भागीदारींमुळे विविध कल्याणकारी शासकीय योजना अधिक लोकोपयोगी होण्यास मदत होणार आहे. शासनाच्या योजना लोक चळवळीच्या स्वरूपात पुढे येत आहे. टाटा ट्रस्टच्या सहकार्याने विविध विभागांच्या माध्यमातून सकारात्मक प्रभाव पाडण्यात यशस्वी होऊ. समाजातील सर्व घटकात उत्पन्न वाढून जगण्याचा स्तर उंचावण्यास यामुळे निश्चितच मदत होईल. दुर्धर आजारांवर महागड्या उपचार पद्धतीमुळे सामान्य नागरिकांना मर्यादा येतात मात्र राज्यात यापुढे उपचाराविना कुणीही मृत्यू पावणार नाही, अशी परिस्थिती निर्माण करण्यात येत आहे. टाटांची मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये मोठी मदत असून यामुळे आपण गरजू रुग्णांना निश्चित स्वरूपाची मदत देऊ शकतो.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, मागील दहा वर्षांपासून टाटा ट्रस्ट सोबत शासन काम करीत आहे. केवळ निधी देऊन भागीदारी होत नाही, तर काम करून समाजात सकारात्मक प्रभाव पाडणारी भागीदारी टाटा करत असते. हे बहु-आयामी करार माता, नवजात बालक, बाल आणि किशोरवयीन घटकांसाठी आरोग्य सेवा बळकट करणे, खुंटलेली वाढ रोखून कुपोषणावर उपाय शोधण्यासाठी मदतगार ठरतील. या सोबतच पोषणासाठी आहारात वैविध्य आणणे, जलस्रोतांचे अधिक शाश्वतपणे जतन आणि व्यवस्थापन, ग्रामीण महाराष्ट्रात हवामान आधारित कृषी आणि पशुधन विकासाला चालना देण्याची क्षमता या भागीदारीत आहे.




नाम फाउंडेशन राज्यात जलसंधारणामध्ये मोठे काम करीत आहे. मागील काळात जल स्त्रोतांमधील गाळ काढणे , नाला, नदी खोलीकरण व रुंदीकरण आदी कामे करण्यात आली आहेत. राज्यात जलयुक्त शिवार योजना यशस्वीपणे राबविण्यात आली. ही योजना लोक चळवळीच्या स्वरूपात पुढे येत जनतेची योजना झाली. नाम फाउंडेशनच्या सहभागाने विदर्भ व मराठवाड्यातील कमी पर्जन्यमान असलेल्या भागात जलसंधारणाचे मोठे काम झाले. यासाठी टाटा मोटर्सचीही मदत झाली असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. टाटा ट्रस्टचे अध्यक्ष नोएल टाटा म्हणाले, महाराष्ट्र शासनाशी भागीदारी करून आरोग्य, शिक्षण, पोषण, उपजीविका, पाणी आणि स्वच्छता कार्यक्रमांमध्ये सुसूत्रता आणणार आहे. सर्व सामान्यांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न राहणार आहे. शासनाचे विविध विभाग आणि समुदायांसोबत सकारात्मक परिणाम आणण्याचा हेतू असणार आहे.

# संपादकीय

## अंकल सॅमचा मदतीचा हात

सगळ्या जगावर टॅरिफ युद्ध लादणारे अंकल सॅम यांनी अखेर नमते घेतले. भारतावर लादलेले ५०% टॅरिफ १८ टक्क्यांवर आणल्याची घोषणा ट्रम्प यांनी केली. ट्रम्प यांच्या या घोषणेमुळे भारत-अमेरिकेत होणाऱ्या मुक्त व्यापार कराराचा मार्ग मोकळा झाला. अमेरिकेने भारतावर लादलेला टॅरिफ २५ टक्क्यांवरून १८ टक्क्यांवर आणणे आणि दोन्ही देशांनी द्विपक्षीय व्यापार समझोता करण्यासंदर्भात ठोस प्रगती करणे या दोन्ही गोष्टी भारतासाठी अत्यंत मोलाच्या आणि उपयुक्त आहेत. या करारावर उभय देशांमध्ये बोलणी झाली ती अत्यंत सकारात्मक. त्यांना लवकरच अंतिम स्वरूप देण्यात येईल असे सांगण्यात येते.

अर्थात ट्रम्प यांनी भारतावर लादलेला टॅरिफ १८ टक्क्यांवर आणल्याचे जाहीर केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही ट्रम्प यांचे आभार मानले. आता याचा फायदा कोणत्या क्षेत्रांना होईल याचा विचार केला तर भारतातील वस्त्रोद्योग, चामड्याच्या वस्तू आणि कार्पेट्स यांच्या निर्यातीला यातून मोठा लाभ होणार आणि यापेक्षाही मोठा फायदा हा की या करारामुळे मध्यम मुदतीचा मॅक्रो बुस्ट व्यापार आणि भांडवली ओघातून मिळेल. भारताला आता रशियाकडून तेलाची खरेदी कमी करावी लागणार आणि ते आवश्यक होते. कारण अमेरिकेला नाराज करून भारताला तेलाची खरेदी परवडणार नव्हती आणि त्या बदल्यात व्हेनेझुएलाकडून तेलाची खरेदी करावी लागेल. भारत अमेरिकेविरुद्धचे भारताचे टॅरिफ आणि नॉन टॅरिफ अडथळे शून्यावर आणले जातील. अर्थात काही प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. ट्रम्प प्रशासनाने भारतावर अनेकदा आरोप केला की भारत रशियाकडून तेल खरेदी वाढवून रशियाच्या युद्धाला अप्रत्यक्ष निधी पुरवत आहे. ट्रम्प यांनी दावा केला, की मोदी यांनी रशियाकडून तेल खरेदी थांबवण्यास आणि व्हेनेझुएलाकडून तेल खरेदी करण्यास संमती दर्शवली आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे, की वाढत्या भू-राजकीय अनिश्चिततेमुळे भारतीय अर्थव्यवस्था लवचिक राहिली आणि आता अनेक महिन्यांच्या वाटाघाटीनंतर त्यात स्पष्टता आली. पण सर्वात मोठा लाभ हा आहे, की टॅरिफ कपातीनंतर भारतातील निर्यातदारांना अमेरिकेला निर्यात वाढवण्याची आशा आहे. इतकेच नव्हे तर भारतातून सीफुड निर्यातही वाढण्याची शक्यता आहे. या कराराचा दोन्ही देशांना फायदा आहे. भारत आता अमेरिकेकडून पेट्रोलियम, संरक्षण आणि औषधे तसेच दूरसंचार उत्पादने आणि विमाने खरेदी करेल. यामुळे भारताच्या संरक्षण सिद्धतेत वाढ होईल आणि अमेरिकन ऊर्जा आणि कोळसा भारत खरेदी करू शकतो याचा फायदा संबंधित क्षेत्रांना होईल आणि भारतीय शेतकरी यांचे जीवनमान सुसह्य होईल. अर्थात हा पहिला टप्पा आहे आणि येत्या काही महिन्यांत अधिक व्यापक करारावर वाटाघाटी केल्या जातील. भारत-अमेरिका व्यापार करारातील संदिग्धता आता नष्ट झाल्यामुळे भारताची निर्यात वाढेल. पण यासोबतच ट्रम्प यांनी एचवनबी व्हिसा शुल्क वाढवल्यामुळे आणि त्यांच्या अमेरिका फर्स्ट या धोरणामुळे इमिग्रेशन धोरण कडक केल्यामुळे भारतीयांना कामावर ठेवणे अमेरिकेतील उद्योगांना शक्य नाही. सेवा क्षेत्रातील धोरणाबाबत अस्पष्टता कायम आहे. भारत-अमेरिका हे दोन्ही देश राजकीय विषयांवर तोडगे काढतात; परंतु महत्त्वाचे आर्थिक प्रश्न तसेच ठेवतात असे चित्र निर्माण झाले. भारत-अमेरिका व्यापार करारामुळे मेड इन इंडिया उपक्रमासाठी लाभदायक बाब ठरली आहे असे मत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी व्यक्त केले. कारण आता १८ टक्के टॅरिफ परस्पर आकारला जाईल. यामुळे दोन्ही देशांना याचा लाभ होईल आणि त्यामुळे ही आनंदाची बातमी आहे, असे त्यानी म्हटले आहे. अर्थात या घटनेमुळे एकूणच भारतीय अर्थजगतात आनंददायी वातावरण असले तरीही राजकीय हालचाली वाढल्या. काँग्रेसने मोदी सरकारवर तीव्र हल्ला चढवला असून काँगेस नेते रमेश यांनी शेलक्या शब्दांत टीका केली, की वॉशिंग्टनमध्ये मोगँबो खूश हुआ. यातील उपरोध लक्षात यावा असा आहे. पण भारत रशियापासून दूर गेलेला नाही.

## संस्कृत सुभाषित

मनसि अन्यद् वचसि अन्यत् कार्यमन्यद् दुरात्मनाम् ।
मनसि एकं वचसि एकं कार्यमेकम् महात्मनाम् ॥

अर्थ : मनात एक बोलतील दुसरेच आणि करतील भलतेच अशी दुष्टांची रीत असते आणि जे मनात आहे तेच बोलतील आणि वागतीलही तसेच असे असतात सज्जन महात्मे !

## गुरु वचन

### सुखी जीवनाची चार सुत्रे

जगातल्या कुठल्याही प्रश्नावर समाधान नाही असे होऊच शकत नाही. त्यात मानव तर विशेष शक्तींचा धनी आहे. जर मानवाकडे निष्ठा व प्रयत्न करण्याची तयारी असेल तर सर्व शक्य आहे. जीवनाला उपयुक्त बनवण्याचे अनेक उपाय आहेत. त्यापैकी चार गोष्टी अशा आहेत, ज्याचा जीवनात समावेश केल्यामुळे बहुतांशी अडचणी सुटू शकतात. या चार गोष्टींना जीवनाचे सार म्हटले जाऊ शकते. सर्व विकारांचा त्याग, कपट सोडून साधेपण स्वीकारणे, बंधनातून मुक्त होण्याचे साहस व जीवनात अध्यात्मवादाचा समावेश केला तर मानवाचे व्यर्थ जीवन उपयुक्त बनेल. त्याच्या जीवनात आनंद व उल्हास, शांती व समाधानात वाढ होईल.

विकार मानव जीवनातील सर्वात मोठा अडथळा आहे. हा दोष मानवाला फक्त विकृती देतो. मानवास उदारता, दान, दया, प्रेम किंवा करुणा प्रवृत्तींपासून वंचित करतो म्हणून त्याच्या भौतिक इच्छा एवढ्या वाढतात की, संग्रह करण्यात त्यास योग्य-अयोग्य, कर्तव्य-अकर्तव्य, आपले-त्रयस्थ, शोषण-पोषण कशाचेच भान राहत नाही. आपला फायदा व मोहासमोर त्यास सर्व आदर्श, सर्व मर्यादा व धोरणं व्यर्थ वाटू लागतात. अशा विकारी मानवाच्या जीवनात शोक-संताप व अशांती, असंतोषाशिवाय दुसरे काय मिळू शकते? विकृती मानवाचा फार मोठा दोष आहे, याचा त्याग केला पाहिजे. उदारता व महानतेची वृत्ती मानवासाठी दोन अलंकार मानले गेले आहेत. ते अंगीकारण्यातच त्याचे भले आहे. उदारतेचा गुण आपल्या इतर गुण त्यागांना प्रोत्साहित करतो. त्याग तपश्चर्यापेक्षा कमी नसतो. त्यागी पुरुष कुठल्याही वस्तुचा संग्रह, धोरण व आदर्शाविरुद्ध नाही. उदारता परमार्थासाठी अर्जित केली जाते. उदार पुरुष निती नियमाने मिळवलेल्या पैशाने सुखी व समाधानी असतो. अशा लोकांचे प्रश्न आपोआप सुटतात.

## उपदेशकथा

### समाधान

एकदा एक माणूस देवाला प्रसन्न करायचे म्हणून तपश्चर्या करण्यासाठी बसला. एक दिवस देव प्रसन्न होऊन त्याला म्हणाला, 'तुला काय पाहिजे ते माग ! त्या माणसाने एकेक गोष्टी मागावयास सुरवात केली. देवाने आपल्या जवळच असलेला कमंडलू थोडासा तिरका केला. त्याप्रमाणे ती ती गोष्ट त्यातून बाहेर पडली. त्याच्या ज्या काही सुखाच्या कल्पना होत्या त्याप्रमाणे त्या गोष्टी मागितल्या. त्या देवाने सर्व दिल्या. त्यानंतर देवाने तो कमंडलू जमिनीवर सरळ उभा करून ठेवला. तसा माणूस म्हणाला, 'या कमंडलूच्या तळाशी काय आहे. तीही गोष्ट मला दे.' देव म्हणाला, 'ती गोष्ट मात्र मी तुला देणार नाही.' माणूस म्हणाला, 'अशी कोणती गोष्ट तळाशी आहे की तू मला देणार नाहीस.' देव म्हणाला, 'त्या गोष्टीचे नाव आहे समाधान. मी तुला समाधान दिले की तू मला विसरशील म्हणून मी तुला समाधान देणार नाही.'

कथा उपदेश : आयुष्यात जरी सर्व काही मिळाले तरी समाधान मिळतेच असे नाही.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:मूल १६:१२:२९ |
| १३ फेब्रुवारी २०२५ | योग:वज्र २७:२२:४९+ |
| शुक्रवार | करण:बालव १४:२६:११ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:कौलव |
| माघ शके संवत्– १९४७ | २७:१७:५६+ |
| संवत्सर – विश्वावसूनाम | सूर्य:कुम्भ ०४:०५:५१ |
| अयन– उत्तरायणारंभ | चन्द्र:धनु |
| मास– माघ | हिजरी सन् – १४४६ |
| ऋतु– सौर शिशिर | मुस्लिम मास – शाबान |
| कृष्ण पक्ष | तारीख – २४ |
| तिथि:एकादशी | विशेष |
| १४:२६:११ | विजया एकादशी |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८५९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 9 | 6 | 4 | | 8 | 2 | | 7 |
| | 3 | 8 | 1 | 2 | 6 | | | |
| 1 | | | | | | | 6 | |
| | | 5 | | | | | | 4 |
| 9 | | | 7 | | 1 | | | 3 |
| 2 | | | | | | 5 | | |
| | 8 | | | | | | | 2 |
| | | | 6 | 7 | 5 | 4 | 8 | |
| 4 | | 7 | 9 | | 2 | 6 | 3 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८५८ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 2 | 1 | 3 | 6 | 9 | 7 | 4 | 5 |
| 5 | 6 | 3 | 4 | 1 | 7 | 2 | 8 | 9 |
| 7 | 4 | 9 | 8 | 5 | 2 | 1 | 6 | 3 |
| 4 | 3 | 5 | 1 | 2 | 6 | 8 | 9 | 7 |
| 1 | 7 | 8 | 9 | 3 | 4 | 5 | 2 | 6 |
| 6 | 9 | 2 | 7 | 8 | 5 | 4 | 3 | 1 |
| 2 | 8 | 6 | 5 | 9 | 1 | 3 | 7 | 4 |
| 3 | 5 | 7 | 6 | 4 | 8 | 9 | 1 | 2 |
| 9 | 1 | 4 | 2 | 7 | 3 | 6 | 5 | 8 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ११३० – इनोसंट दुसरा पोपपदी.
- १५७५ – हेन्री तिसरा फ्रांसच्या राजेपदी.
- १६६८ – स्पेनने पोर्तुगालचा स्वातंत्र्य मान्य केले.
- १९३४ – चेलियुस्किन हे रशियाचे जहाज आर्क्टिक समुद्राच्या बर्फात अडकुन फुटले व बुडाले.
- १९४५ – दुसरे महायुद्ध – सोवियेत सैन्याने हंगेरीची राजधानी बुडापेस्ट काबीज केली.
- १९६० – फ्रांसने पहिली परमाणुबॉम्बची चाचणी केली.

### राष्ट्रीय

- २००७ – उत्तर प्रदेशात बस कालव्यात कोसळून ८ ठार.
- २००८ – नॅशनल ॲसोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर ॲण्ड सर्व्हिसेस कंपनीज 'नॉसकॉम' आणि वायसने टाटा समूहाचे अध्यक्ष रतन टाटा यांची २००८ च्या लीडरशिप ग्लोबल इंडियन ॲवार्डसाठी निवड केली.

### जन्म

- १५९९ – पोप अलेक्झांडर सातवा यांचा जन्म.
- १९११ – फैझ अहमद फैझ, पाकिस्तानी कवी यांचा जन्म.
- १९१५ – आँग सान, म्यानमारचा स्वातंत्र्यसैनिक यांचा जन्म.
- १९२३ – चक यीगर, नासाचा स्वनातीत विमान चालवणारा प्रथम वैमानिक यांचा जन्म.
- १९३३ – पॉल बिया, कामेरूनचा अध्यक्ष यांचा जन्म.

### निधन

- ११३० – पोप ऑनरियस दुसरा यांचे निधन.
- १२१९ – मिनामोटो नो सानेटोमो, जपानी शोगन यांचे निधन.
- १३२२ – ॲंड्रोनिकस, बायझेन्टाईन सम्राट यांचे निधन.

## : SMS :

Mandir me
Pujari Purush hi
Q hota hai ?
Socho socho !!
Arey
Taaki Bhakt
Bhagawan Par
Dhyan De sake...

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २८.४ | १६.३ |
| अहमदनगर | २७.९ | १६.५ |
| अकोला | ३१.२ | १७.६ |
| अमरावती | ३०.२ | १६.६ |
| बीड | ३१.४ | १६.५ |
| भंडारा | ३१ | १३.६ |
| बुलढाणा | २५.२ | ८.६ |
| चंद्रपूर | ३१.४ | १७.६ |
| चेन्नई | २८.४ | २२ |
| नवी दिल्ली | २५.७ | १३.१ |
| धुळे | ३०.६ | १९.६ |
| गोंदिया | २९.६ | १५.५ |
| जळगाव | ३०.४ | १७.८ |
| कोल्हापूर | २९.४ | १४.९ |
| लातूर | २९.४ | १६.१ |
| मुंबई | ३२.३ | २३.३ |
| नागपूर | ३०.१ | १६.८ |
| नांदेड | ३०.४ | १८.१ |
| नंदूरबार | २८.९ | १९.१ |
| नाशिक | २९.३ | १५.२ |
| पुणे | २८.६ | १८ |
| पंढरपूर | २९.६ | १७.२ |
| सातारा | २९.८ | १०.६ |
| सांगली | ३०.५ | १५.१ |
| सोलापूर | ३०.२ | १८.१ |
| वर्धा | ३१.३ | १६ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:उत्तर अविवाहितांना लग्नाचे प्रस्ताव येतील. कामकाजाचे क्षेत्र विस्तारीत होईल.

**तुळ :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा : उत्तर व्यापार चांगला चालेल. कार्यक्षेत्रात नवीन योजनेमुळे फायदा होईल.

**वृषभ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:दक्षिण प्रतिष्ठित व्यक्तींच्या उदारपणामुळे आपली कार्यक्षमता वाढणार आहे.

**वृश्चिक :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:उत्तर फायदेशीर बातम्या ऐकण्यास मिळतील. जुना रोग उदभवण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:दक्षिण लोकांशी संपर्क वाढवून आपण आपल्या योजना पूर्णत्वास न्याल.

**धनु :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा: उत्तर आपली कार्यकुशलता व इतरांच्या सहयोगाने कामात यश मिळेल. आपले विचार योग्य असतील. कर्मचाऱ्यांवर लक्ष ठेवा.

**कर्क :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा: पश्चिम साहित्य वाचनाची गोडी वाढणार आहे.आधिकारी लोकांशी नवीन संबध जुळतील.

**मकर :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व सहनशिलता कमी होऊ देऊ नका. आर्थिक अडचणी येऊ शकतील. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील.


**सिंह :** शुभ रंग:गुलाबी शुभ दिशा:पश्चिम विश्वासदर्शक वातावरण राहील. स्वत:च्या प्रयत्नाने समाजात मान मिळेल. स्थायी संपत्ती विषयी वाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पूर्व रचनात्मक कार्यात प्रगती होईल. मुलांच्या इच्छा पूर्ण होतील. फायद्याच्या संधी मिळतील.

**कन्या :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा: पश्चिम नातेवाईकाशी असलेले संबंध मर्यादित ठेवा. मुलांच्या प्रकृतीत सुधारणा होईल.

**मीन :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पूर्व कौटुंबिक समस्या दूर होतील. फायदेशीर चर्चा घडून येईल. भोग-विलास प्रवृत्तीत वाढ होईल. व्यापार चांगला चालेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८५९



### आडवे शब्द

१. भोवंडून टाकणारा वारा
४. विचित्र
६. नाव ठेवण्याचा विधी
९. हुक्की, लहर
१०. मिठी
११. स्तुती करणारा
१३. लज्जा
१४. वाद्य, दागिना
१६. श्री विष्णुचे बटु रुप
१८. रोजच्या स्वयंपाकात वापरले न जाणारे धान्य
१९. कामदेव
२१. वाघाचे ओरडणे
२२. मृत्यू नसलेला
२३. सहा पट
२५. पांढरा, गुबगुबीत प्राणी
२६. तोरा, ताठा, अब्रू
२७. इंधन
२९. देवळाचा मुख्य दरवाजा
३१. उत्तरदायी
३३. दारूच्या एक प्रकार
३४. रस्ता, पथ
३५. पूर्वजन्मीच्या चांगल्या कामाचे गाठोडे घेऊन आलेला
३७. न्हाणीघर
३८. गप्प बसायला सांगणे, एखाद्याचे वर्म सांगणे (वा.प्र.)
४२. जाडसर पीठ
४४. तात्काळ, लगोलग
४६. लाल रंगाचे, जाड पाकळ्यांचे फूल
४७. खमणचा प्रसिद्ध प्रकार
४८. मुंग्यांचे घर
४९. माघार घेणे
५०. बारशाचा दिवस
५१. पाळता येण्याजोगे जनावर
५३. नवे कोरे
५६. रवींद्रनाथ टागोर यांचा काव्य संग्रह
५९. परवाना हिच्याकडे झेपावतो
६१. वहीत उभी सोडलेली जागा
६२. देण्याघेण्याची चर्चा
६५. शंकराला वाहण्याचे त्रिदल
६७. उपमाता, बाळ सांभाळणारी बाई
६८. खर्चात कपात
७०. विनंती, मागणी
७१. डोंगरातील वाट
७४. छोटा, बारीक
७६. भेग, चीर
७८. पाप करण्यास भिणारा
७९. गाडीचे छत
८१. उथळ मोठी वाटी
८२. द्रव्य, सोने इ.ने श्रीमंत असलेला

### उभे शब्द

१. गंध
२. जंगलातील आग
३. रायगडावरील कडा
४. देवाचे देहधारी रूप
५. लग्नाची कापडखरेदी
६. श्वसनेंद्रीय
७. कलावंत
८. मातीचा कण
१०. छिद्रातून पडणारे ऊन
१२. वाकडा
१४. मारलेली हाक
१५. राष्ट्रगीताची सुरवात
१७. कप्पा, खण
१८. माझे
१९. दिग्दर्शक भांडारकर याचे नाव
२०. हिंदीत शपथ
२२. एक आश्चर्याचा उद्गार
२४. हिंदीत भोई, मराठीत उपद्व्यापी
२५. पातळसर
२६. 'गंगाधर टिपरे' यांचे घरगुती नाव
२८. 'आज-उद्या'पेक्षा फारच लांबचा वायदा
३०. विनाकारण, ३१. श्वापद
३२. आपले म्हणणे पुढे रेटणे
३५. विद्येचे माहेरघर
३६. अनुमती, ३९. बांगड्यांचा व्यवसाय करणारा
४०. लाच, वरचा पैसा
४१. हिंदीत विलंब
४३. घोडा
४५. कोवळी फांदी
४७. गवताची पेंढी
४९. घरामागचे अंगण
५१. आता लुप्त झालेली एक बौद्धकालीन भाषा
५२. ताब्यात आलेला
५४. अस्वल
५५. लोकरीचे उबदार वस्त्र
५७. कास्य
५८. जहाज, नौका इ.
६०. मर्कट
६२. पांथस्थ, प्रवासी
६३. एक जुना लेखणी प्रकार
६४. रॉकेल, ६६. शाश्वत
६९. प्रामाणिक, सोज्वळ
७२. मोजणी करणारा
७३. समाप्त
७५. बाजार, ७७. टपाल
७८. पातक, ८०. प्रवासातील टप्पा

### जम्बो शब्दकोडे क्र. ८५८ चे उत्तर

आडवे उत्तर : १.सदाफली ४.वातारण ७.सुधाकर ११.कनवाळू १३.हीन १४.समरसता १५.सकट १७.आवार १८.मान १९.रीटा २०.वाहक २२.सान २३.कड २५.तम २६.दरवाजा २८.जन २९.सल ३०.दान ३१.पाक ३२.यदा ३३.संतापजनक ३५.अक्कल ३६.हत ३७.हयातभर ३८.सावज ३९.कपाल ४१.जान ४२.व ४३.सजा ४५.नकलाकार ४७.पनीर ४८.जननी ५०.दूत ५२.टच ५३.सवय ५४.कपार ५५.अंगारकी ५७.लुकडा ६०.सदन ६२.जरतर ६३.चळवळ ६४.हे राम ६५.लव ६६.कंप ६७.समई ६८.आवाज ६९.पतन ७१.रावण ७२.राज ७३.खर ७४.शान ७७.वाचा ७९.मधमाशी ८१.सवाल ८२.सक्षम ८३.नरकयातना

उभे उत्तर : १.सरसरीत २.फुकट ३.लीन ४.वाळू ५.वहिवाट ६.रनर ७.सुमन ८.धार ९.कस १०.रताळे १२.वार्ताहर १४.समान १६.कटाप २०.वादक २१.कवायत २२.सान २३.कलप २४.जनकजननी २७.जादा २८.जलयान २९.सतार ३०.दानव ३१.पालक ३३.संभवनीय ३४.जसा ३५.अवस ३६.हलकट ३७.हजार ४०.पान ४४.जादूगार ४६.लाचलुचपत ४७.पवन ४८.जपान ४९.नर ५१.तरतरीत ५४.कदम ५५.अंजनी ५६.कीर ५८.कळ ५९.डावखेरा ६०.सराईत ६१.ऐवज ६४.हेम ६५.लवाजमा ६७.सणवार ६८.आराधना ६९.परवा ७०.नशा ७३.खस ७५.नस ७६.राम ७८.चाक ७९.मत ८०.शील

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### “कुणाल तसा नाही जसा तो दिसतो : ‘लक्ष्मी निवास’ मालिकेत प्रवेश करणारा किंशुक वैद्य!

पुणे (दैनिक संध्या) : झी टीव्हीवरील ‘लक्ष्मी निवास’ ही कौटुंबिक मालिका मध्यमवर्गीय स्वप्ने, नाती आणि संयुक्त कुटुंबातील दैनंदिन वास्तविकता यांचे हृदयस्पर्शी चित्रण करून प्रेक्षकांच्या मनाला स्पर्श करत आहे. लक्ष्मी आणि श्रीनिवास यांच्या प्रवासाला केंद्रस्थानी ठेवत, ही मालिका सातत्याने प्रेम, त्याग आणि एकत्र आयुष्य घडवताना घ्यावे लागणारे कठीण निर्णय यांचे नवीन स्तर उलगडत आहे. कथेला एक नवीन आणि रोचक वळण देत लोकप्रिय अभिनेता किंशुक वैद्य ‘लक्ष्मी निवास’मध्ये कुणालच्या महत्त्वपूर्ण भूमिकेत सहभागी होत आहे. कुणाल हा एक असा माणूस आहे की जो दिसायला जणू खूपच परिपूर्ण वाटतो: देखणा, यशस्वी, सुसंस्कृत आणि दुसऱ्यांचा आदर करणारा. त्याच्या शांत आणि सुसंस्कारी वर्तनामुळे तो लगेचच सर्वांची मने जिंकतो. कोणत्याही कुटुंबाला आपल्या मुलीसाठी योग्य वाटेल असा तो मुलगा वाटतो. वैयक्तिक आयुष्यात रोमँटिक आणि व्यावसायिक जीवनात अत्यंत एकाग्र असलेला कुणाल भावना आणि अपेक्षा यांचे सहज संतुलन राखू शकतो. मात्र त्याच्या या परिपूर्ण दिसणाऱ्या व्यक्तिमत्त्वाच्या आड एक अत्यंत गुंतागुंतीचा स्वभाव लपलेला आहे. कथानक पुढे सरकत असताना प्रेक्षकांना कळत जाते की कुणालच्या वागण्यात काही विलक्षण वैशिष्ट्ये आहेत आणि त्याच्या भावनांचे स्तरही खूप खोल आहेत. त्यामुळेच तो ‘लक्ष्मी निवास’मध्ये आतापर्यंत प्रवेश केलेल्या सर्वांत रोचक पात्रांपैकी एक ठरतो. आपल्या प्रवेशाबद्दल बोलताना किंशुक वैद्य म्हणाला, “कुणाल हे पात्र वरवर खूप सुसंगत आणि आकर्षक वाटते, कोणाशी काय बोलावे, कसे वागावे आणि लोकांच्या आयुष्यात आपली जागा कशी निर्माण करावी हे त्याला उत्तम ठाऊक आहे. पण अभिनेता म्हणून मला सगळ्यात जास्त उत्सुकता याची आहे की त्याच्या बाह्य व्यक्तिमत्त्वाखाली खूप काही दडले आहे. ही व्यक्तिरेखा अनेक स्तर असलेली, अनपेक्षित आणि भावनांनी भरलेली अशी आहे, ज्याचा अंदाज तुम्हांला सहज येणार नाही. त्याच्या विविध छटा शोधताना मला खूप आनंद होत आहे कारण तुम्हांला त्याच्याबद्दल ज्या क्षणी वाटतं की आता तो समजला, तेव्हाच तो काहीतरी नवीन दाखवतो. ‘लक्ष्मी निवास’मध्ये कुणालचा प्रवास प्रेक्षकांनी अनुभवावा याची मी आतुरतेने वाट पाहत आहे.” किंशुक वैद्यच्या कुणाल म्हणून झालेल्या प्रवेशासह ‘लक्ष्मी निवास’ आता एका रोमहर्षक नवीन पर्वात प्रवेश करणार आहे, इथे आता भावना अधिक तीव्र होतील, अनपेक्षित वळणे येतील आणि ‘लक्ष्मी निवास’ कुटुंबाच्या आयुष्यात नवीन नाट्यमय वादळ निर्माण होईल. पहा कुणालचा प्रवेश आणि पुढे उलगडणारे नाट्य ‘लक्ष्मी निवास’ मध्ये दर सोमवार ते शुक्रवार संध्याकाळी 7 वाजता फक्त झी टीव्हीवर!

### नोंदणी व मुद्रांक विभागातील गट-ड पदभरतीबाबत उमेदवारांच्या याद्या प्रसिद्ध

पुणे (दैनिक संध्या) : नोंदणी व मुद्रांक विभागात गट-ड संवर्गातील २८४ पदे भरतीची प्रक्रिया सुरु असून उमेदवारांच्या कागदपत्र पडताळणीअंती निवड यादी, प्रतिक्षा यादी, निवडीसाठी नकार दिलेल्या उमेदवारांची यादी, अपात्र उमेदवारांची यादी तसेच कागदपत्र पडताळणीसाठी गैरहजर उमेदवारांची यादी https://igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. या विभागातील गट-ड पदभरतीसाठी आय.बी.पी.एस. कंपनीमार्फत जुलै- २०२५ मध्ये परीक्षा घेण्यात आली होती. उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून सामाजिक व समांतर आरक्षणानुसार आणि गुणवत्तेनुसार कागदपत्र पडताळणी करण्यात आली असून निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीच्या अनुषंगाने समुपदेशनासाठी बोलावण्यात येणार आहे. त्याबाबत नोंदणी व मुद्रांक विभागाच्या संकेतस्थळावर स्थळ व तारीख लवकरच प्रसिद्ध करण्यात येईल, अशी माहिती राज्याचे नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक रविंद्र बिनवडे यांनी कळविली आहे.

### ड्रेनेज दुरुस्त करायला आलेल्या व्यक्तीने 7 कोटी लुटले, नवा चक्रावणारा प्रकार समोर

पुणे (दैनिक संध्या) : पुण्यात सायबर फसवणुकीच्या वाढत्या घटनांमध्ये आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एका सेवानिवृत्त ६१ वर्षीय अधिकाऱ्याला ड्रेनेजलाइन दुरुस्तीच्या बहाण्याने तब्बल ६ कोटी ७० लाख ३७ हजार ५०० रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. या प्रकरणी विश्रामबाग पोलिस ठाण्यात तक्रार दाखल झाली असून, आर्थिक गुन्हे शाखेकडून तपास सुरू करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार हे सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियामधून अतिरिक्त संचालक पदावरून निवृत्त झाले आहेत. यांच्या आईच्या नावे पुण्यातील नवी पेठ येथे एक बंगला भाड्याने दिलेला आहे. भाडेकरूने घरातील ड्रेनेजलाइनमध्ये समस्या असल्याचे सांगितल्यानंतर, संदीप चव्हाण नावाच्या एका व्यक्तीने स्वतःला महापालिकेचा अधिकारी असल्याचे सांगून संपर्क साधला. त्याने ड्रेनेजलाइन स्वतंत्रपणे टाकण्याचा प्रस्ताव दिला आणि सुरुवातीला केवळ ६५ हजार रुपयांचा खर्च सांगितला. तक्रारदारांनी ही रक्कम ऑनलाइन ट्रान्सफर केली. मात्र यानंतर फसवणूक करणाराने वेगवेगळ्या बहाण्याने पैसे मागितले.

# ‘हिंद दी चादर’ कार्यक्रमासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे

**विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी : अतिमहत्त्वाच्या व्यक्तींपासून सामान्य नागरिकांपर्यंत कोणतीही गैरसोय होऊ नये, सूक्ष्म नियोजनाचे निर्देश**

पुणे (दै. संध्या) :

‘हिंद दी चादर’ कार्यक्रमासाठी येणाऱ्या अतिमहत्त्वाच्या व्यक्तींपासून सामान्य नागरिकांपर्यंत कोणालाही कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये. यासाठी सर्व प्रशासकीय यंत्रणांनी सूक्ष्म नियोजन करून परस्पर समन्वयाने काम करावे आणि कार्यक्रम शिस्तबद्ध व शांततापूर्ण पद्धतीने पार पाडावा, अशा सूचना कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिल्या.



श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त दि. २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी खारघर, सेक्टर २९ येथील ओवे मैदानावर आयोजित करण्यात येणाऱ्या ‘हिंद दी चादर’ या ऐतिहासिक कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी आज कोकण विभागीय कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. सूर्यवंशी बोलत होते.

या बैठकीस सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) फरोग मुकादम, अपर आयुक्त (आस्थापना) मिनल कुटे, सहआयुक्त (नगरपालिका प्रशासन) विजयकुमार म्हसाळ, सहआयुक्त (करमणूक) रविंद्र पवार, पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते, पोलीस उपायुक्त (वाहतूक) तिरुपती काकडे, सहायक पोलीस आयुक्त विक्रम कदम, पनवेल महानगरपालिकेचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते, नवी मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे व सुनील पवार, राज्य समन्वयक तथा उपजिल्हाधिकारी रविंद्र राठोड, प्रभारी माहिती उपसंचालक मनोज सानप, प्रादेशिक परिवहन अधिकारी जयंत चव्हाण यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. तसेच ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, मुंबई ग्रामीण व मुंबई शहरचे जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे याबैठकीत सहभागी झाले होते.

यावेळी कार्यक्रमाची एकूण रूपरेषा, जनजागृती उपक्रम, प्रभात फेऱ्या, विद्यार्थी व युवकांचा सहभाग, मुख्य सोहळ्याचे नियोजन तसेच कायदा व सुव्यवस्था, वाहतूक, सुरक्षा, स्वच्छता आणि आरोग्य सुविधांबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रभावी प्रचारासाठी होर्डिंग व बॅनरचा वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये निबंध, चित्रकला, वक्तृत्व व गायन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून ‘हिंद दी चादर’ विषयावरील माहितीपट, चित्रपट व गीतांचे सादरीकरण करण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

कार्यक्रमस्थळी अग्निशमन विभागामार्फत फायर ऑडिट करणे, पिण्याच्या पाण्याची व इतर आवश्यक सुविधांची व्यवस्था करणे, भाविकांसाठी निवास व्यवस्था उपलब्ध करून देणे, परिसर स्वच्छ ठेवणे तसेच वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नियोजनबद्ध उपाययोजना करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर भाविकांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी वैद्यकीय सुविधा सज्ज ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

‘हिंद दी चादर’ कार्यक्रमाच्या माध्यमातून श्री गुरु तेग बहादूर यांच्या त्याग, शौर्य आणि बलिदानाचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन करत, हा कार्यक्रम सामाजिक ऐक्य, सद्भावना आणि ऐतिहासिक मूल्यांची जाणीव निर्माण करणारा ठरेल, असा विश्वास डॉ. सूर्यवंशी यांनी व्यक्त केला. तसेच कार्यक्रमाच्या आयोजनात कोणतीही त्रुटी राहू नये यासाठी सर्व विभागांनी दक्षता, समन्वय आणि जबाबदारीने काम करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

## राज्यातील सर्वात मोठा सौर ऊर्जेचा महोत्सव पुण्यात

पुणे (दै. संध्या) :

राज्यातील सर्वात मोठ्या सौर ऊर्जा उपकरण प्रदर्शनाचे आयोजन द महाराष्ट्र सोलर मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (मास्मा) यांच्या वतीने १३, १४ आणि १५ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आले आहे. शिवाजीनगर येथील नवीन कृषी महाविद्यालयाच्या मैदानावर सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत होणारे “मास्मा रिन्यूएबल एनर्जी एक्स्पो २०२६” हे प्रदर्शन नागरिकांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे. प्रदर्शनाचे हे यंदाचे ७ वे वर्ष आहे.

या तीन दिवसीय प्रदर्शनात सौर उर्जेवर चालणारे सोलर वॉटर हिटर, सोलर रुफटॉप सिस्टिम्स, सोलर हायब्रीड सिस्टिम्स, स्ट्रक्चर्स, मायक्रो इन्व्हर्टर तसेच घरगुती आणि औद्योगिक वापरासाठी विविध अत्याधुनिक उपकरणे पाहायला व खरेदीसाठी उपलब्ध असतील. या प्रदर्शनामध्ये ९६ हून अधिक सौर व अक्षय ऊर्जा उपकरण उत्पादकांचा सहभाग अपेक्षित असून, देशातील आघाडीच्या कंपन्या, तंत्रज्ञान पुरवठादार, ईपीसी कंपन्या, वित्तीय संस्था, धोरणनिर्माते तसेच शैक्षणिक संस्थाही सहभागी होणार आहेत. छोट्या घरगुती गरजांपासून ते लघु व मध्यम उद्योगांसाठी लागणाऱ्या मोठ्या प्रकल्पांपर्यंत सर्व प्रकारची उत्पादने येथे उपलब्ध असणार आहेत. राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री चंद्रकांतदादा पाटील आणि ऊर्जा राज्यमंत्री सौ. मेघना बोर्डीकर तसेच महाराष्ट्र ऊर्जा विकास संस्था (मेडा) चे महासंचालक ओमप्रकाश बकोरिया (आयएएस), महावितरणचे स्वतंत्र संचालक श्री विश्वास पाठक यांची भेट आणि मार्गदर्शन या निमित्ताने होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. सौर उत्पादक, डीलर्स, डिस्ट्रीब्युटर्स, ईपीसी कंपन्या तसेच संबंधित घटकांचे प्रतिनिधित्व करणारी मास्मा ही गेल्या २५ वर्षांपासून अक्षय ऊर्जा क्षेत्रात कार्यरत आघाडीची संघटना आहे. राज्यात सौर ऊर्जा स्वीकार, अक्षय ऊर्जा प्रसार आणि शाश्वत विकासासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील आहे.

## 'इंटरनॅशनल अ‍ॅग्री हॅकाथॉन इन पुणे २०२६' चे १५ ते १७ मे दरम्यान भव्यस्वरुपात आयोजन : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

**पुणे शहर कृषी-तंत्रज्ञान केंद्र म्हणून विकसित होण्याच्या दिशेने सज्ज**

पुणे (दै. संध्या) :

■ विजेत्यास २५ लाख रुपये ; उपविजेत्यास १५ लाख रुपये बक्षीस

पुणे शहर आणि परिसराची कृषी क्षेत्रातील नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानातील आघाडी लक्षात घेऊन, शहराला नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान विकासाचे 'हब' बनवण्यासाठी 'इंटरनॅशनल अ‍ॅग्री हॅकाथॉन इन पुणे २०२६' या स्पर्धेचे कृषी महाविद्यालय, पुणे येथे १५, १६ आणि १७ मे २०२६ या कालावधीत भव्यस्वरुपात आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे.



स्पर्धेचे वेळापत्रक : यास्पर्धेत स्पर्धकांना सहभागी होण्याकरिता २३ फेब्रुवारी ते ३१ मार्च या कालावधीत ऑनलाईनपद्धतीने अर्ज स्वीकरण्यात येणार आहे. प्राप्त अर्जाची तज्ज्ञ समितीद्वारे छाननी करुन अंतिम फेरीतील स्पर्धकांची निवड ३० एप्रिल रोजी करण्यात येणार आहे. कृषी महाविद्यालय, पुणे येथे १५, १६ आणि १७ मे २०२६ येथे प्रत्यक्ष स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे.

स्पर्धेचे मुख्य विषय: स्पर्धकांना जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी आणि जमिनीचा पोत राखण्यासाठी नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान, स्मार्ट जलव्यवस्थापन: पाण्याचा दर्जा, ऑटोमेशन आणि फर्टिगेशनमधील नवकल्पना, शेती यांत्रिकीकरण: शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि रोबोटिक्सचा वापर, कृषी प्रक्रिया आणि मूल्य साखळी: विपणन आणि निर्यातीसह प्रक्रिया तंत्रज्ञान, अक्षय ऊर्जा: शेतीमधील अक्षय ऊर्जेचा वापर आणि शेतीतील कचरा व्यवस्थापन, पीक संरक्षण: कीड आणि रोगांचे भाकीत व व्यवस्थापन, हवामान अनुकूल, डिजिटल आणि शाश्वत शेतीमधील बदल आणि शेतकऱ्यांनी स्वतः विकसित केलेली नाविन्यपूर्ण साधने किंवा तंत्रज्ञान या आठ महत्त्वाच्या विषयांवर आधारित आपले नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान सादर करता येतील.

विजेत्यांसाठी आकर्षक बक्षिसे: या स्पर्धेतील विजेत्यांना प्रोत्साहन देण्यासाठी मोठी बक्षीसे जाहीर करण्यात आली आहेत. अंतिम फेरीतून निवडल्या जाणाऱ्या विजेत्यास २५ लाख रुपये तर उपविजेत्यास १५ लाख रुपयांचे रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे. पुणे हे कृषी आणि तंत्रज्ञानाचे संगम केंद्र असून, या हॅकाथॉनच्या माध्यमातून देशातील गुणवंत संशोधकांना आणि शेतकऱ्यांना आपले कौशल्य दाखवण्याची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. अधिकृत संकेतस्थळ अद्ययावत करण्याचे काम सुरु असून ते २३ फेब्रुवारीपासून उपलब्ध होणार आहे. अधिक माहितीसाठी आणि अर्ज सादर करण्याकरिता संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन श्री. डुडी यांनी केले आहे.

## पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे १७ फेब्रवारी रोजी आयोजन

पुणे (दै. संध्या) :

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत भोर, पुरंदर, मुळशी व वाघोली येथे मंगळवार, १७ फेब्रवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे.




सरदार कान्होजी जेधे शासकीय आद्यौगिक प्रशिक्षण संस्था भोर येथे आयोजन करण्यात येणार आहे. निटॅब इंडिया प्रा.लि. डेलवल प्लो कंट्रोल्स प्रा.लि, प्रसाद इंटरप्राईजेस, अ‍ॅनटेक टेक्नोलॉजी फांउडेशन, यशस्वी अ‍ॅकडमी फॉर स्किलींग, प्रयोग इलेक्ट्रिकल्स प्रा.लि. व यझाकी इंडिया प्रा.लि., बजाज अ‍ॅटो लि. या कंपन्यातील एकूण ६७० रिक्तपदे भरण्यात येणार आहे.

क्रांतिकारक उमाजी नाईक शासकीय आद्यौगिक प्रशिक्षण संस्था, पुरंदर येथे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये इलेक्ट्रॉनिका इंडिया प्रा.लि, यशस्वी अ‍ॅकडमी फॉर स्किलींग, जेएस सायाकी लि, देवकी मोटर्स एलएलपी, फोर्ट जाधवगड, यझाकी इंडिया प्रा.लि., बजाज अ‍ॅटो लि. या कंपन्यातील एकुण ६४५ रिक्तपदे भरण्यात येणार आहे.

सिम्बॉयसिस सेंटर फॉर ट्रेनिग इन अ‍ॅडव्हान्स मॅन्युफॅक्चरिंग टेक्नॉलोजिस, सिम्बॉयसिस कम्युनिटी कॉलेज, गट नं. १०१९ पौड रोड, मु.पो. दारवली, ता. मुळशी, जि. पुणे येथे आयोजन करण्यात येणार आहे.

यामध्ये हिंदुस्तान कोका कोला बेवरेज प्रा.लि., वॉस ऑटोमोटिव्ह इंडिया, होर पेंकिग सिस्टिम प्रा.लि., वल्कन टेक्नोलॉजिस प्रा.लि., पुसळकर सुरक्षा कंम्पोनंटस, यशस्वी अ‍ॅकेडमी फॉर स्किलींग, स्कॅटो इंडिया प्रा.लि, महाले आनंद फिल्टर सिस्टीम, ब्रिनटन्स कारपेंटस एशिया प्रा.लि., जिझल इंडिया प्रा.लि., यझाकी इंडिया प्रा.लि. बजाज अ‍ॅटो लि. या कंपन्यातील एकुण ७७८ रिक्तपदे भरण्यात येणार आहे.

भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, वाघोली, पुणे येथे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये कॉन्सेंट्रीक पंप्स पुणे प्रा.लि., दर्शना इंडस्ट्रीज प्रा.लि, वॅलीओ इंडिया प्रा.लि., सिलीकंट प्रा.लि., जीकेएन ड्राईव्ह लाईन इंडिया लि. यशस्वी अ‍ॅकेडमी फॉर स्किलीग, यझाकी इंडिया प्रा.लि. बजाज अ‍ॅटो लि. या कंपन्यातील एकुण ८६५ रिक्तपदे भरण्यात येणार आहे.

या रिक्तपदांकरिता किमान १० वी, १२ वी, पदवीधर, पदव्युत्तर पदवी, आयटीआय, पदविका, बीई अशा विविध पात्रताधारक उमेदवारांकरिता असून जिल्ह्यातील अधिकाधिक नोकरीइच्छुक उमेदवारांनी या रोजगार मेळाव्याच्या उपस्थित राहावे.

खाजगी क्षेत्रातील या विविध रिक्तपदांकरिता नोकरीइच्छूक उमेदवारांनी मंगळवार दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वा. रोजगार मेळाव्याच्या ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित राहावे. मुलाखतीस येतांना उमेदवारांनी सोबत सर्व शैक्षणिक कागदपत्राच्या छायांकित प्रती, पारपत्र आकाराचे छायाचित्रे, आवश्यकतेनुसार अर्जाच्या प्रती सोबत आणाव्यात, अधिक माहितीसाठी www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळाला भेट देऊन मेळाव्यातील रिक्तपदांना शैक्षणिक अहर्तानुसार अर्ज करावे. तसेच जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र पुणे, ४८१ रास्ता पेठ, सरदार मुदलीयार रोड, पुणे ४११०११ येथे प्रत्यक्ष संपर्क साधावा अथवा ०२०-२६१३३६०६ या दूरध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य, विकास, रोजगार, उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पुणे या कार्यालयाचे सहायक आयुक्त सुरेश वराडे यांनी केले आहे.

# नायकाचे हृदय : देवच्या भावनिकदृष्ट्या नाजूक क्षणांना खोली देताना अभिषेक शर्मा!

पुणे (दै. संध्या) :

झी टीव्ही आपल्या दमदार नायकांमधून ‘मर्द को दर्द नहीं होता’ या रूढीवादी संकल्पनेला छेद देत आहे कारण हे नायक आपली संवेदनशील बाजू दाखवायला घाबरत नाहीयेत. समाजात अशी ठाम गैरसमजूत आहे की “खरा पुरुष” म्हणजे कधीही न डगमगणारा, कायम संयमी आणि कधीही आपला कमीपणा न दाखवणारा असतो. पण जेव्हा गोष्ट कुटुंबाबद्दल असते तेव्हा अनेक पुरुष एक वेगळेच सत्य दाखवतात, जिथे ताकद आणि संवेदनशीलता या दोन्ही गोष्टी एकत्र नांदू शकतात. झी टीव्हीच्या ‘वसुधा’ मालिकेत देवची भूमिका साकारणारा अभिनेता अभिषेक शर्माने प्रेक्षकांच्या मनाची तार छेडली आहे. केवळ आपल्या ताकद किंवा ठाम भूमिकेसाठी नव्हे, तर त्याच्या प्रवासाला ओळख देणाऱ्या त्याच्या शांत आणि अंतर्मुख संवेदनशीलतेसाठीही तो लक्षात राहतो. पारंपरिक टीव्ही नायकांपेक्षा वेगळी असलेली देवची व्यक्तिरेखा ही अनेक स्तरांची, भावनिकदृष्ट्या गुंतागुंतीची आणि अतिशय मानवीय आहे असे अभिषेक सांगतो.

देव आणि वसुधाचा प्रवास सध्या खूपच खडतर टप्प्यातून जात आहे, ज्यामुळे दोघेही भावनिकदृष्ट्या असुरक्षित झाले आहेत. या भावना त्यांच्या नात्यात अडथळा ठरतील की सर्व अडचणी असूनही त्यांना पुन्हा एकत्र आणण्यास मदत करतील? देव आणि वसुधाच्या प्रवासाचा पुढील टप्पा जाणून घेण्यासाठी पहा ‘वसुधा’ ही मालिका दररोज रात्री 9:30 वाजता फक्त झी टीव्हीवर!

ह्या भूमिकेकडे पाहण्याच्या आपल्या दृष्टिकोनाबद्दल बोलताना अभिषेक त्याला सर्वाधिक जवळचे वाटणाऱ्या देवच्या काही भावनिक क्षणांविषयी सांगतो. तो म्हणाला, “मला वैयक्तिकरित्या सर्वांत जास्त प्रभावित करणारा प्रसंग तो होता जेव्हा चंद्रिका (परीणीता बोरठाकूर यांनी साकारलेली भूमिका) देवशी बोलणे थांबवते. त्या वेळी देवला अशा व्यक्तीशी बोलायचे असते जिच्याशी तो मनापासून बोलू इच्छितो, म्हणून तो आपल्या आईला फोन करतो, जी प्रत्यक्षात त्याच्यासमोरच बसलेली असते. त्या प्रसंगाचा भार इतका तीव्र होता की शूटिंगदरम्यान माझ्या डोळ्यांत पाणीच आले आणि शूट संपल्यानंतर मी थेट ग्रीनरूममध्ये जाऊन माझ्या आई-वडिलांना फोन केला.” तो पुढे म्हणाला, “देवचे शांत राहणे, त्याचे आंतरिक संघर्ष आणि तो हरवला आहे असे वाटणारे क्षणच त्याला वास्तविक बनवतात. जवळपास दोन वर्षे ही भूमिका साकारल्यानंतर मला असं वाटतं की अभिषेक आणि देव यांच्यातील सीमारेषा पुसट झाल्या आहेत.” वैयक्तिक नुकसानासोबत झगडणे, जबाबदाऱ्यांचे ओझे पेलणे किंवा मनात दडलेल्या भावना व्यक्त करण्यात येणाऱ्या अडचणी अशा सगळ्या गोष्टी देवच्या संवेदनशीलतेतून समोर येतात आणि ‘वसुधा’ च्या कथेला अधिक खोली देतात.

अभिषेक देवची भावनिक अवस्था प्रभावीपणे दाखवण्यासाठी देहबोली, पॉझेस आणि संयमित हावभाव यांवर जाणीवपूर्वक भर देतो. त्यामुळे देव फारसे न बोलताही त्याच्या भावना प्रेक्षकांपर्यंत पोहोचवतो. तो पुढे म्हणाला, “आता तर मी माझ्या स्वतःच्या नावापेक्षा देवला जास्त प्रतिसाद देतो.” देवचे कुटुंबाशी असलेले नाते आणि त्याच्यासमोर उभे राहणारे नैतिक पेचप्रसंग त्याला अनेकदा भावनिक वळणावर आणून ठेवतात. अशा प्रसंगांमध्ये अभिषेक ते नाटकीय पद्धतीने न साकारता ते संवेदनशीलतेने साकारतो.



# ओला-उबेर चालकांकडून मीटरप्रमाणे भाडे वसुली

## प्रवाशांकडून संताप व्यक्त




**पुणे (दै. संध्या) :**

अॅप-आधारित टॅक्सी सेवा देणाऱ्या ओला आणि उबेर चालकांकडून प्रवाशांकडून अॅपवर दाखवलेल्या रकमेऐवजी मीटरप्रमाणे किंवा अतिरिक्त पैसे मागितले जात असल्याच्या तक्रारींमध्ये अलीकडे मोठी वाढ झाली आहे. या प्रकारामुळे प्रवाशांचा मानसिक तसेच आर्थिक छळ होत असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

साधारणपणे ओला आणि उबेरवर प्रवास बुक करताना अॅपवरच भाड्याची निश्चित रक्कम दाखवली जाते. ही रक्कम अंतर, वेळ, ट्रॅफिक आणि मागणी-पुरवठ्याच्या आधारे ठरवली जाते. नियमानुसार प्रवाशाने अॅपवर दर्शवलेली रक्कमच अदा करणे अपेक्षित असते. मात्र प्रत्यक्षात काही चालक प्रवाशांना फोन करून 'मीटरने येणार', 'अॅपचे भाडे कमी आहे', 'ऑफलाइन पैसे द्या' असे सांगून अधिक पैसे मागत असल्याचे प्रकार समोर येत आहेत.

काही प्रकरणांमध्ये भाडे न दिल्यास बुकिंग रद्द करणे, प्रवासात अडथळा आणणे किंवा मध्येच उतरवण्याचा दबाव टाकला जात असल्याच्या तक्रारीही पुढे येत आहेत. त्यामुळे विशेषतः महिलां, ज्येष्ठ नागरिक आणि रात्री प्रवास करणाऱ्या प्रवाशांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे.

वाहतूक तज्ज्ञांच्या मते, अॅप-आधारित टॅक्सी सेवांमध्ये अॅपवर दाखवलेले भाडेच अंतिम मानले जाते. मीटरप्रमाणे वेगळे पैसे मागणे किंवा ऑफलाइन व्यवहार करण्यास भाग पाडणे हे नियमबाह्य ठरू शकते. ग्राहकांची फसवणूक किंवा जबरदस्ती केल्यास संबंधित चालक तसेच कंपनीवर कारवाई होऊ शकते.

दरम्यान, काही चालकांनी इंधन दरवाढ, अॅप कंपन्यांचे कमिशन, वाहन देखभाल खर्च आणि ट्रॅफिकमुळे वाढणारा वेळ यामुळे अॅपवरील भाडे अपुरे पडत असल्याचे सांगत आपली बाजू मांडली आहे. मात्र या कारणांमुळे प्रवाशांकडून नियमबाह्य पद्धतीने अतिरिक्त पैसे मागणे योग्य नसल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

नागरिक आणि प्रवासी संघटनांनी प्रशासनाकडे या प्रकाराची दखल घेऊन कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. अॅपवरील भाडेच अंतिम असल्याची स्पष्ट अंमलबजावणी, तक्रार नोंदणीची सुलभ व्यवस्था आणि नियम मोडणाऱ्या चालकांवर दंडात्मक कारवाई करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

ओला-उबेरसारख्या सेवांचा उद्देश पारदर्शक आणि सोयीस्कर प्रवास देणे हा असताना, वाढत्या तक्रारींमुळे प्रवाशांचा विश्वास डळमळीत होत आहे. या प्रकारावर लवकरात लवकर नियंत्रण आणण्याची गरज नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

ओला-उबेरसारख्या अॅप-आधारित सेवांचा मुख्य उद्देश प्रवाशांना पारदर्शक आणि निश्चित भाड्यात सुरक्षित प्रवास देणे हा आहे. अॅपवर स्पष्ट रक्कम दाखवली जात असताना चालकांकडून मीटरप्रमाणे किंवा अतिरिक्त पैसे मागणे ही गंभीर बाब आहे. यामुळे प्रवाशांचा मानसिक तसेच आर्थिक छळ होत असून, ग्राहकांचा या सेवांवरील विश्वास कमी होत आहे.

> प्रशासन आणि संबंधित कंपन्यांनी याची तातडीने दखल घेऊन अॅपवरील भाडेच अंतिम असल्याची कडक अंमलबजावणी करावी, तसेच नियम मोडणाऱ्या चालकांवर कारवाई करावी. प्रवाशांना सुरक्षित, पारदर्शक आणि त्रासमुक्त सेवा मिळणे हीच काळाची गरज आहे.
>
> **- प्रवासी, ओला/उबेर**

# पुणे महापालिकेच्या स्थायी समितीसाठी भाजपमध्ये रस्सीखेच

**पुणे (दै. संध्या) :**

पुणे महापालिकेच्या स्थायी समितीमध्ये स्थान मिळविण्यासाठी भाजपमध्ये मोठी रस्सीखेच असून, कोअर कमिटीने सुमारे २४ जणांची यादी प्रदेश भाजपकडे पाठवली आहेत. यातील अंतिम १२ नावे हे दुपारी सर्वसाधारण सभेपूर्वी मिळणार आहेत. त्यामुळे स्थायीमध्ये कोणाची वर्णी लागणार याकडे लक्ष लागले आहे. तर काँग्रेस व राष्ट्रवादीमध्येही चढाओढ लागली आहे. पुणे महापालिकेच्या स्थायी समितीसह शहर सुधारणा समिती, नाव समिती, महिला व बाल कल्याण समिती, विधी समिती, क्रीडा समिती, शिक्षण समितीसाठी सदस्य नियुक्ती करण्यासाठी शुक्रवारी (ता. १३) दुपारी तीन वाजता महापालिकेची सर्वसाधारण सभा होणार आहे. या सभेत प्रत्येक पक्षाकडून सदस्यांची यादी महापौरांकडे सादर केली जाणार आहे. त्यानंतर नावे जाहीर होतील. पुणे महापालिकेचे स्थायी समिती अध्यक्षपद मिळावे यासाठी भाजपमधील अनेक जुने नगरसेवक प्रयत्न करत आहेत. तसेच जे नगरसेवक आगामी विधानसभा निवडणुकीसाठी स्पर्धक ठरणार आहेत.

# रस्ते अपघातातील मृत्यू कमी करण्यासाठी कठोर उपाययोजना

**पुणे (दै. संध्या) :**

- नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई व परवाना रद्द- जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी
- अनधिकृत होर्डिंगवर २१ दिवसांची नोटीस; घाट मार्गांवर लेन ओलांडण्यास प्रतिबंध आणि साईन बोर्ड लावण्याच्या सूचना



जिल्ह्यातील रस्ते अपघातातील मृत्यूंचे प्रमाण कमी करण्यासाठी अपघातग्रस्त (ब्लॅकस्पॉट) भागांवर तातडीने उपाययोजना राबविणे, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करून परवाने रद्द करणे तसेच अनधिकृत होर्डिंग हटविण्यासाठी २१ दिवसांची नोटीस देऊन कारवाई करणे, यासह घाट मार्गांवर लेन ओलांडण्यास प्रतिबंध घालण्याच्या स्पष्ट सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता भरतकुमार बाविस्कर, पुणे शहर वाहतूक शाखेचे उपायुक्त हिंमत जाधव, सहायक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वपनील भोसले, पिंपरी-चिंचवडचे राहूल जाधव, बारामतीचे सुरेंद्र निकम, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक संजय कदम, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत जिल्हाधिकारी डुडी यांनी स्पष्ट केले की, पुणे शहर व जिल्ह्यातील वाहतुकीला शिस्त लागण्यासाठी नियमभंग करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करावी. दंड न भरणाऱ्या वाहनधारकांचे वाहन चालविण्याचे परवाने रद्द करण्याची कार्यवाही करावी. आतापर्यंत सुमारे तीन हजार वाहनधारकांचे परवाने रद्द करण्यात आले असल्याची माहिती त्यांनी दिली. वाहतूक कोंडीमागे नियमांचे उल्लंघन हे एक प्रमुख कारण असून नागरिकांनी स्वयंशिस्त पाळणे आवश्यक असल्याचे आवाहनही त्यांनी केले. जिल्ह्यात वार्षिक ९०० पेक्षा अधिक अपघाती मृत्यू होत असल्याचे निदर्शनास येत असल्याने ब्लॅकस्पॉटचे सखोल सर्वेक्षण करून तातडीने सुधारणा करणे गरजेचे असल्याचे अधोरेखित करण्यात आले.

मागे झालेल्या बैठकीतील सूचनांनुसार प्रादेशिक परिवहन विभागाने ब्लॅकस्पॉटचे सर्वेक्षण पूर्ण केले असून ४२ ब्लॅक स्पॉट होते त्यातील १५ ब्लॅक स्पॉट काढण्याचे काम सुरु आहे. उर्वरित ब्लॅक स्पॉट काढण्याची संबंधित विभागांनी कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले. हिंजेवाडी व चाकण परिसरातील वाढत्या वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर विशेष उपाययोजना करण्याचेही निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

जिल्ह्यातील एमएसआरडीसी, एनएचआय व सार्वजनिक बांधकाम विभागांनी त्यांच्या अखत्यारीतील अनधिकृत होर्डिंगवर तात्काळ कारवाई करावी. संबंधितांना २१ दिवसांची नोटीस देऊन त्यानंतर उर्वरित होर्डिंग काढून टाकावीत, असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. तसेच घाट मार्गांवर वाहनांनी लेन ओलांडून पुढे जाण्यास प्रतिबंध घालून आवश्यक तेथे साईन बोर्ड व चेतावणी फलक लावावेत. शक्यतोवर मुख्य रस्त्यावर गतिरोधक करु नयेत, धोकादायक जनक्शन असल्यास अप्रोच/दुय्यम रस्त्यावर इंडियन रोड कॉंग्रेस प्रमाणे गतिरोधक व चिन्हानकन करावे. पुणे ग्रँड टूर सायकल स्पर्धेच्या धर्तीवर इंडियन रोड कॉंग्रेसच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे स्मूथ गतीरोधक असावेत. मुख्य रस्त्याला पांढऱ्या पट्ट्या, दिशादर्शक फलक लावावेत.

> नवले ब्रिज परिसरातील अपघात कमी करण्यासाठी समितीमार्फत आयआयटी दिल्लीचे मार्गदर्शन घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता, त्यानुसार आयआयटीचे पथक, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण,पोलीस विभाग, महानगरपालिकांचे अधिकारी मिळून सोमवारी भेट देवून पाहणी करावी. यावेळी पत्रकार, नागरिकांनी आपल्या सूचना कराव्यात, असे आवाहन श्री. डुडी यांनी केले आहे.

# मुख्यमंत्र्यांकडून सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनांचा आढावा




पुणे (दै. संध्या) : मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुणे जिल्ह्यातील वर्ष २०२६-२७ च्या सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेचे प्रारुप आराखडे अंतिम करण्यासाठी दूरदृष्यप्रणालीद्वारे बैठक घेतली. शासनाने ठरवून दिलेल्या वित्तीय मर्यादेपेक्षा अतिरिक्त निधीची मागणी या बैठकीत जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाकडून करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याअध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थान येथे आयोजित बैठकीस उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुनेत्रा पवार, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, वित्त व नियोजन राज्यमंत्री अॅड. आशिष जयस्वाल, मुख्यमंत्र्याच्या अतिरिक्त मुख्य सचिव अश्विनी भिडे आणि प्रधान सचिव श्रीकर परदेशी, मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी आदी उपस्थित होते.

तर विभागीय आयुक्त कार्यालयातून उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार योगेश टिळेकर, भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, बापूसाहेब पठारे, ज्ञानेश्वर कटके, बाबाजी काळे, शंकर मांडेकर, हेमंत रासणे, पुणे शहराचे महापौर मंजुषा नागपुरे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, जिल्हा पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता राजेंद्र राहणे, अधीक्षक अभियंता भरतकुमार बाविस्कर, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर आदी उपस्थित होते.

# पुणेकरांना काश्मीर आयकॉनचे भावनिक आवाहन

**पुणे (दै. संध्या) :**



काश्मीर आणि महाराष्ट्र यांचे नाते केवळ पर्यटनापुरते मर्यादित नसून ते आपुलकी, विश्वास आणि परस्पर सन्मानाचे प्रतीक आहे, असे मत काश्मीर आयकॉन संघटनेने व्यक्त केले आहे. पुण्यात प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवेदनात काश्मीर आयकॉनने पुणेकरांप्रती कृतज्ञता व्यक्त करत काश्मीर पर्यटनाच्या पुनरुज्जीवनासाठी पुणेकरांनी पुढाकार घ्यावा, असे भावनिक आवाहन केले आहे. यावेळी काश्मीर आयकॉनचे व्यवस्थापकीय संचालक नासिर शाह, संचालक मीर अन्वर, अथेर यामीन, शोकत पख्तून आदी मान्यवर उपस्थित होते. काश्मीर आयकॉनच्या वतीने सांगण्यात आले की, महाराष्ट्राने नेहमीच काश्मिरी बांधवांना आपुलकीने स्वीकारले आहे. ऑक्टोबर ते एप्रिल या कालावधीत हजारो काश्मिरी कारागीर व व्यापारी महाराष्ट्रात येतात आणि येथील सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग बनतात. हा केवळ व्यवसायाचा संबंध नसून परंपरा, जिव्हाळा आणि विश्वासाचे नाते असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. २२ एप्रिल रोजी घडलेल्या दुर्दैवी घटनेनंतर काश्मीरच्या पर्यटन क्षेत्राला मोठा भावनिक व आर्थिक फटका बसला आहे.

मात्र, अशा कठीण काळात महाराष्ट्राने नेहमीच काश्मीरच्या पाठीशी उभे राहत आधार दिला असल्याचे काश्मीर आयकॉनने अधोरेखित केले. या पार्श्वभूमीवर काश्मीर पुन्हा एकदा पर्यटकांचे स्वागत करण्यासाठी सज्ज असून, या पर्यटन पुनरागमनाचे नेतृत्व पुणेकरांनी करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. "इतर कोणी गेले नाही तरी पुणेकर काश्मीरला जातील," असा ठाम विश्वास व्यक्त करत "चला... चला काश्मीर!" हा भावनिक संदेश देण्यात आला. चिनार वृक्षांची शोभा, केशराची सुवर्णशेती आणि अतिथीदेवो भवः ही काश्मीरची समृद्ध परंपरा पुणेकरांची आतुरतेने वाट पाहत असल्याचे काश्मीर आयकॉनने सांगितले. पुणेकरांच्या एकतेच्या, माणुसकीच्या आणि संवेदनशीलतेच्या भावनेला सलाम करत काश्मीरला आपले दुसरे घर मानून पुन्हा एकदा भेट देण्याचे आवाहन काश्मीर आयकॉनच्या वतीने करण्यात आले.

## कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग क्र.१, पुणे

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग क्र.१, पुणे विभागातील विविक्षित कामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या आस्थापनेवरुन दि.३१/०१/२०२६ पासुन उपअभियंता (यांत्रीकी) या संवर्गातुन सेवानिवृत्त झालेल्या १ उपअभियंता यांना करार पध्दतीने घेणेबाबत अर्ज मागविण्यात येत आहे.

अ) विहीत नमुन्यातील अर्ज दि. २०/०२/२०२५ ते दि. २५/०२/२०२६ रोजी कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग क्र.१, पुणे या कार्यालयात (शासकीय सुट्टी सोडुन) दुपारी २.०० वाजेपर्यंत प्राप्त होतील. सदरचे अर्ज विभागीय कार्यालयास दि.२७/०२/२०२६ रोजी दु.५.०० वाजेपर्यंत स्विकारले जातील. त्यानंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

ब) सर्व कागदपत्रांसह मुलाखतीकरिता उपस्थित राहण्याची दिनांक. ०४/०३/२०२६ रोजी वेळ दुपारी १२.०० वाजता

स्थळ :- कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग क्र.१, स.नं.22/23, डॉ. आंबेडकर रोड,
मझदा बिल्डींग, पुणे ४११००१
दिनांक : १०.०२.२०२६

सही/-
(अर्जुन नाडगौडा)
कार्यकारी अभियंता महाराष्ट्र
जीवन प्राधिकरण विभाग क्र.१
पुणे ४११००१

विमाका/पुणे/जाहि./३१४/२०२५-२६

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम (पुर्व) विभाग, पुणे- ४११००१
दुरध्वनी क्रमांक ०२०/२६१२२४५७
Web- www.mahapwd.gov.in and e-mail- eastpune.ee@mahapwd.gov.in

### ई-निविदा सूचना क्रमांक १४० सन २०२५-२०२६

कार्यकारी अभियंता, पुणे सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग, पुणे ४११००१ (दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२४५७) हे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी/२०१७/प्र. क्र. ०८/इमा-२. दिनांक २७/९/२०१८ व शासन सा.बां. विभाग, मंत्रालय मुंबई यांचे परिपत्रक क्र. सीएटी/२०१७/प्र. क्र. ८/इमा-२. दिनांक २२/१०/२०१८ अन्वये नोंदणीकृत अथवा अनोंदणीकृत आणि निविदेमधील दिलेल्या पात्रता पुर्ण करत असलेल्या कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावीत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पुर्व) विभाग, पुणे - १ यांनी राखून ठेवलेला आहे. तसेच अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये | अंदाजित रक्कम रुपये (अक्षरात) |
|---|---|---|---|
| १ | अ) कन्हेरी येथील समृद्धी वनउद्यान मध्ये साहसी खेळांच्या परिसरात पदपथ व रेलिंगची दुरुस्ती/बांधकाम करणे ता. बारामती जि. पुणे. ब) कन्हेरी येथील समृद्धी वनउद्यान मध्ये मोरी दुरुस्ती/बांधकाम करणे ता. बारामती जि. पुणे. क) कन्हेरी येथील समृद्धी वनउद्यान मध्ये चेक पोस्ट (स्मरणिका दुकान) बांधकाम करणे ता. बारामती जि. पुणे. ड) कन्हेरी येथील समृद्धी वनउद्यान मध्ये प्रवेशद्वाराच्या परिसरातील पदपथ दुरुस्ती / बांधकाम करणे ता. बारामती जि. पुणे. इ) कन्हेरी येथील समृद्धी वनउद्यान मध्ये रॉकगार्डन परिसरातील पदपथ दुरुस्ती / बांधकाम करणे ता. बारामती जि. पुणे. | २,४९,१८,२८३/- | रुपये दोन कोटी एकोणपनानास लाख अठरा हजार दोनशे त्र्याऐंशी फक्त |

टिप

वरील निविदेत एकूण ०१ काम समाविष्ट असून या निविदेवरील संपुर्ण माहिती खालीप्रमाणे संकेतस्थळावर दि. १३-०२-२०२६ पासून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.
web - www.mahapwd.gov.in (फक्त निविदा सुचना)
https://mahatenders.gov.in (निविदा सुचना व निविदा कागदपत्रे)
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास त्याबाबतची शुध्दीपत्रके वरील वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येतील.)

सही/-
उप कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (पुर्व) विभाग,
पुणे-४११००१.

क्रमांक : आरओसी-2025-26/क्र-5/C5689

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः गाव पाळू, ता.खेड.जि. पुणे येथील व आसपासचे सर्व लोकांस आमचे आशिल श्री. सखाराम किसन आनंदराव, रा. पारुंडे, ता.जुन्नर, जि. पुणे यांनी सांगितलेवरुन जाहीर नोटीस देण्यात येते की, खाली परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही आमचे आशिलांची वडिलोपार्जीत मालकी तावेवहिवाटीची

मिळकत असून सदरहू मिळकतीमध्ये आमचे आशिलांचा त्यांचे वडील श्री. किसन रामभाऊ आनंदराव यांचा कायदेशीर वारस म्हणून समाईकात अविभक्त हिस्सा व हक्क जन्मानेच हिन्दु कायद्याप्रमाणे आहे. सदरहू मिळकती संदर्भात आमचे आशिलांचे वडील. कुटुंबिय तसेच नातेवाईक म्हणजेच १) श्री. किसन रामभाऊ आनंदराव, रा. उर्दू शाळेसमोर, खराळवाडी, पिंपरी, पुणे ४११०१८ २) श्री. शांताराम रामभाऊ आनंदराव, रा. पाळू, ता. खेड, जि. पुणे ३) छाया विठ्ठल आनंदराव (लग्नापूर्वीचे नाव) सौ. छाया राजीव भालेराव (लग्नानंतरचे नाव), रा. मोनालिशा हॉटेलजवळ, बदलापूर, ठाणे, महाराष्ट्र ४२१५०३ ४) अनुसया विठ्ठल आनंदराव, रा. पाळू, ता. खेड, जि. पुणे ५) श्री. दिपक विठ्ठल आनंदराव, रा. पाळू, ता. खेड, जि. पुणे, ६) श्री. अमोल विठ्ठल आनंदराव, रा. सहकार नगरी, नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे ४१०५०४ ७) श्री. राजेंद्र बबन आनंदराव, रा. पारुंडे, ता. जुन्नर, जि. पुणे ८) श्री. पंढरीनाथ विठ्ठल चौधरी, रा. हनुमान मंदिराजवळ, घाटकोपर वेस्ट, ४०००८४ ९) श्री. सुरेश दगडू भालेराव, रा. आतार चाळ, मंचर, पुणे ४१०५०३ १०) श्री. गणेश कुंडलिक भालेराव, रा. वाडा, ता. खेड, जि. पुणे ११) श्री. हनुमंत किसन आनंदराव, रा. उर्दू शाळेसमोर, खराळवाडी, पिंपरी, पुणे शहर ४११०१८ १२) मालन राजेंद्र गाडेकर, रा. खानगाव, ता. जुन्नर, जि. पुणे १३) जयश्री विश्वास शिंदे, रा. उर्दु शाळेसमोर, खराळवाडी, पिंपरी, पुणे शहर ४११०१८ १४) गंगुबाई किसन आनंदराव, रा. उर्दू शाळेसमोर, खराळवाडी, पिंपरी, पुणे शहर ४११०१८ १५) शांताराम रामभाऊ आनंदराव, रा. पारुंडे, ता. जुन्नर, जि. पुणे १६) श्री. संतोष शंकर गुरव, रा. पाळू, ता. खेड, जि. पुणे यांनी आमचे आशिलांना विश्वासात न घेता तसेच आर. टी. एस. अपील क्र. ७६८/२०२५ चे अपिलाचे कामी जाणून-बुजून पक्षकार न करता केवळ आमचे आशिलांचा समाईकातील हिस्सा डावलण्याच्या दुष्ट हेतुने व आमचे आशिलांचे हिश्याची मिळकत गिळंकृत करण्याचे क्लिष्ट भावनेने व द्वेष बुध्दीने केवळ आमचे आशिलांची दिशाभूल व फसवणूक करण्यासाठी १) श्री. निलेश पंढरीनाथ पाटील, रा. स.नं. ४२४९, धनश्री हॉटेल, आकुर्डी, पुणे शहर ४११०३५ व २) श्री. सोमनाथ गोरेश्वर भोंडवे, रा. स.नं. १९१, मोरया निवास, शिंदे वस्ती, रावेत, विठ्ठल नगर, पुणे यांचेबरोबर दि. २६/०८/२०२५ रोजी नोंदणीकृत साठेखत दस्त क्र. ८३१९/२०२५ व नोंदणीकृत कुलमुखत्यारपत्र दस्त क्र. ८३२०/२०२५ हे दोन दस्त खाली परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात अस्तित्वात आणले असून त्याआधारे सदरहू परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती तिऱ्हाईत इसमांस विक्री करण्याचे तयारीत आहेत. वास्तविक सदरहू मिळकतीमध्ये आमचे आशिलांचा समाईकात अविभक्त असा मालकी हक्क, हिस्सा व अधिकार असून सदरहू मिळकती संदर्भात कोणीही कोणत्याही प्रकारचा नोंदणीकृत हस्तांतरणाचा व्यवहार एव्हढेच नव्हेतर खरेदीखत, मुखत्यारपत्र, साठेखत, वुईलपत्र, मृत्युपत्र, इच्छापत्र, बक्षीसपत्र, हक्कसोडपत्र वा इतर कोणत्याही स्वरुपाचे नोंदणीकृत दस्त अगर करार-मदार त्याचप्रमाणे तबदिलीचे व्यवहार अस्तित्वात आणू नयेत. तसले कुठलेही दस्त अस्तित्वात आणल्यास संबंधीत मिळकतीचा ताबा मिळणार नाही तसेच संबंधीत व्यक्तीविरुध्द योग्य ती दिवाणी व फौजदारी स्वरुपाची कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

कुणाचीही फसवणूक होवू नये म्हणून आगावू प्रसिध्दी केली असे.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका खेड मे. दुय्यम निबंधक साहेब खेड, यांचे हद्दीतील गांव मौजे पाळू, ता. खेड येथील मिळकती खालीलप्रमाणे,

| ग. नं. | क्षेत्र हे. आर | आकार रु. पै. | चतुः सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| ७१५ | १.२८ पो.ख. ०.०४ एकूण १.३२ | १.१९ | ग. नं. ७१६ ७२० | ग. नं. ७१४ | ग. नं. ७१४ | ग. नं. ७३७ |
| ७१४ | ४.०४.२० पो.ख. ०.१२.०० एकूण ०४.१६.२० | ५.०० | ग. नं. ७१५ ७०८ | ग. नं. ७११ | ग. नं. ७११ | ग. नं. ७३७ |
| यापैकी | १.५१.५७ पो.ख. ०.०४.५० एकूण १.५६.०७ | १.८८ | | | | |
| २२२ | ०.२६ | ०.३७ | ग.नं. २२१ | ग. नं. २२३ | ग. नं. २२४ | ग. नं. २२० |
| यापैकी | ०.१० | ०.१५ | | | | |
| ७११ | ८.३८.७० पो.ख. ०.७७.०० एकूण ९.१५.७० | २२.३८ | ग. नं. ७०९, ७१० | ग. नं. ६८५ ६८६ ६८८ ६७७ | ग. नं. ६७१ ६७३ ६७४ | ग. नं. ७१४ ७३७ |
| यापैकी | ३.१४.५१ पो.ख. ०.३८.८७ एकूण ०.४३.३८ | ८.४० | | | | |
| ६७९ | ०.७५.२० पो.ख. ०.०३,०० एकूण ०.७८.२० | २.७६ | ग.नं. ६८३ | ग.नं. ६८० ६८१ | ग.नं. ६७६ | ग.नं. ६७८ ६७७ |
| यापैकी | ०.२८.२० पो.ख. ०.०१.१२ एकूण ०.२९.३२ | | | | | |

येणे प्रमाणे वर्णनाची बागायत मिळकत व त्यातील दगड, माती, झाडझाडोरा, इ. तदंगभूत वस्तूंसह तसेच जाणेयेणेचे सर्व हक्कासह व सर्व इजमेंटरी राईटसह दरोबस्त मिळकती.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस
दि. १२/२/२०२६

सही/-
अॅड. गणेश किसन डेरे (अॅडव्होकेट)
शॉप नं.१९, ए.चिंग, सावळेराम मार्केट
पुणे नाशिक हायवे, नारायणगांव ता. जुन्नर-पुणे,
मो. नं. ७७५८०३३६७०

## महावितरण — ई - निविदा सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

महावितरण केडगाव संवसु विभागाअंतर्गत, Infrastructure Development for release new connection/ enhancement of Load (RCI) and other except Ag) व BMDTC, BMLT, BMHT दुरुस्तीचे कामे करण्याकरिता नोंदणीकृत कंत्राटदारांकडून एक वर्षा करिता नोंदणीकृत (Empaneled) करण्याकरिता ऑनलाईन ई निविदा मागविण्यात येत आहेत. **निविदा क्रमांक 1. EE/KED/Tech/NSC/05/25-26 2. EE/KED/Tech/BMDTC/06/25-26 3. EE/KED/Tech/BMLT/07/25-26 4. EE/KED/Tech/BMHT/08/25-26. सदर निविदा विक्री दि. 13.02.2026 ते दि. 22.02.2026 पर्यंत उपलब्ध आहे.** व निविदा सादर करण्याची **अंतिम तारीख 22.02.2026 23:00 वाजेपर्यंत** राहील. निविदा तपशील व डाऊनलोड करण्यासाठी कृपया महावितरणच्या **https://etender.mahadiscom.in/eatApp** संकेतस्थळाला भेट दया. कोणतेही कारण न देता निविदा स्वीकारणे/नाकारणे व रद्द करणे यासाठी सर्व हक्क अधोरेखित आहेत. कृपया नोंद घ्या. **https://etender.mahadiscom.in/eatApp/ मो.क्र. 7875768147**

PRO No. PRO/BMTZ/205/2025-26 — कार्यकारी अभियंता, केडगाव विभाग

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पिंपरी चिंचवड शहरात 17 फेब्रुवारीपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू

पिंपरी चिंचवड (दैनिक संध्या) : आगामी काळात साजरे होणारे सण, उत्सव, क्रांतिवीर लहुजी साळवे पुण्यतिथी व वासुदेव बळवंत फडके पुण्यदिनाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१)(३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. हे आदेश १७ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत लागू राहतील. या आदेशान्वये कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ, ज्वलनशील द्रव पदार्थ बाळगणे,दगड अथवा शस्त्रे किंवा अस्त्रे, सोडावयाची अस्त्रे किंवा फेकावयाची हत्यारे अगर साधने तसेच काचेचे तुकडे व काचेच्या रिकाम्या बाटल्या बरोबर नेणे, जमा करणे व तयार करणे, शस्त्रे, सोटे, भाले, चाकु, सुरा, कोयता, तलवारी, दंड, काठया, बंदुका व शारीरिक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणत्याही इसमाचे चित्राचे, प्रतिकात्मक प्रेताचे, पुढाऱ्यांच्या चित्राचे, प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे, मोठमोठयाने अर्वाच्य घोषणा देणे, वाद्य वाजविणे यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहचेल किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा राज्य उलथवून देण्यास प्रवृत्त करेल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे किंवा आविर्भाव करणे, कोणतेही जिन्नस तयार करून त्याचा जनतेत प्रसार करणे या कृत्यावर बंदी घालण्यात आली आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ च्या कलम ३७ चे पोटकलम (३) प्रमाणे पाच किंवा पाच पेक्षा जास्त लोकांचा जमाव करण्यास तसेच पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे पुर्व परवानगी शिवाय सभा घेणेस किंवा मिरवणूक काढण्यास बंदी मनाई राहील. वरील आदेश हा शासनाच्या सेवेतील व्यक्तींना व ज्यांना आपल्या वरिष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्यपुर्तीसाठी हत्यार बाळगणे आवश्यक आहे त्यांना लागू होणार नाही. या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधीत व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन-१९५१ चे कलम १३५ प्रमाणे शिक्षेस पात्र होईल, असे पिंपरी चिंचवड पोलीस सह आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर यांनी कळविले आहे.

### दीड लाखाच्या लोखंडी पार्टची अफरातफर; चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

पिंपरी चिंचवड (दैनिक संध्या) : मोशी येथील एका ट्रान्सपोर्ट कंपनीतून सुमारे १ लाख ५० हजार रुपयांच्या लोखंडी पार्ट्सची अफरातफर झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी चालकाविरुद्ध भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.०९ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३ ते सायं. ७ वाजण्याच्या दरम्यान लॉगवे ट्रान्सपोर्ट, बोऱ्हाडे वस्ती, मोशी येथून माल रवाना करण्यात आला होता. संबंधित चालकाकडे पिकअप गाडी (क्र. MH 14 JL 8348) सोपविण्यात आली होती. हा माल नऱ्हे येथील एका इंजिनिअरिंग कंपनीत पोहोचविणे अपेक्षित होते. मात्र चालकाने विश्वासघात करून माल ठरलेल्या ठिकाणी न पोहोचवता परस्पर विक्री करून गाडी नवी मुंबई विमानतळा जवळ सोडून तो फरार झाला असल्याची तक्रार फिर्यादीने दिली आहे. आरोपी इरफान असारी (वय २६, रा. नेतासुर हुराब्बा, महाराजगंज, उत्तर प्रदेश) हा सध्या फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पानसरे करत आहेत.

### आळंदी- चऱ्होली रोडवरील हॉटेलमध्ये सुरु होता वेश्या व्यवसाय



पिंपरी चिंचवड (दैनिक संध्या) : आळंदी- चऱ्होली रोडवरील हॉटेलवर वेश्या व्यवसाय सुरू असल्याची माहिती मिळाल्यावर पोलिसांनी छापा टाकून १७ पीडित महिलांची सुटका केली आहे. सहा जणांना अटक करण्यात आली. मंगळवारी (दि.१०) मध्यरात्री दोन वाजताच्या सुमारास आळंदी- चऱ्होली रोडवरील साई पॅलेस हॉटेलमध्ये ही कारवाई करण्यात आली. कृष्णा सुरेश पाटील (वय ३५), राज मोहन शेट्टी (वय ५२), संजय अमीन बावरी (वय २५), साबीर अक्तर अली (वय ३१), भरत दत्तात्रय बिराजदार (वय २७) व विक्रम हिरा वढ (वय ३२) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. तर याच्यासह हॉटेलचालक पद्मलोचन दास ऊर्फ कालूशेठ, हॉटेलमालक अवधूत गाढवे यांचा शोध घेतला जात आहे. या सर्वांच्या विरोधात भारतीय न्याय संहिता कलम १४३, ३ सह अनैतिक व्यापारास प्रतिबंध अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस शिपाई महेश भारत लाडे (२८, रा. वडमुखवाडी) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १७ महिलांना पैशाचे आमिष दाखवून वेश्याव्यवसाय करवून घेतला जात होता. छाप्यात पोलिसांनी ५१ हजार ७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी दिघी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# २.५ किमी उच्च क्षमतेची वीजवाहिनी टाकणार

## 'डीपीडीसी"च्या बैठकीत आमदार शंकर जगताप यांची निधी देण्याची मागणी

**पिंपरी (दै. संध्या) :**

चिंचवड मतदारसंघात येणाऱ्या जुनी सांगवी परिसरातील वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्याच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी आमदार शंकर जगताप यांनी पुढाकार घेतला आहे. गुरुवारी झालेल्या पुणे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये आग्रही भूमिका घेत त्यांनी एनसीएल पाषाण उपकेंद्र ते महावितरणच्या औंध कर्मचारी वसाहतीपर्यंत उच्च क्षमतेची (२२ के.व्ही.३०० स्क्वेअर मिमी) नवीन वीज वाहिनी टाकण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी जोरदार मागणी आमदार शंकर जगताप यांनी केली. या मागणीला बैठकीत सकारात्मक प्रतिसाद मिळाला.



पुणे जिल्हा नियोजन समितीची बैठक गुरुवारी पार पडली. या बैठकीमध्ये चिंचवड मतदार संघातील अनियमित वीजपुरवठ्यावरून आमदार शंकर जगताप यांनी आग्रही भूमिका घेतली. या बैठकीत बोलताना आमदार जगताप म्हणाले, चिंचवड मतदार संघातील जुनी सांगवी परिसरात अनेक ठिकाणी अखंडीत विद्युत प्रवाह होत असल्याने वीज ग्राहकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. जुनी सांगवी परिसरात अनेक ठिकाणी व्होल्टेज चढ-उतार आणि केबल बिघाडाच्या घटना घडत असल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागला. विशेषतः या भागातील पवार नगर परिसरात २७ जुलै २०२५ रोजी विद्युत प्रवाह अचानक वाढल्याने अनेक घरांतील टीव्ही, फ्रिज व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे जळाल्याच्या घटना घडल्या होत्या. त्यामुळे नागरिकांचे आर्थिक नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर एनसीएल पाषाण उपकेंद्र ते महावितरणच्या औंध कर्मचारी वसाहतीपर्यंत (सुमारे २.५ किमी) २२ के.व्ही., ३०० स्क्वेअर मिमी क्षमतेची नवीन उच्च दर्जाची व सुरक्षित वीज वाहिनी टाकण्याची मागणी आमदार शंकर जगताप यांनी पुणे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत केली आहे. सद्यस्थितीत असलेली मुख्य केबल जुनी व तांत्रिकदृष्ट्या कमकुवत झाली असून अनेक ठिकाणी जॉइंट्स असल्यामुळे वारंवार बिघाड होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. नवीन उच्च क्षमतेची केबल टाकण्यात आल्यास वीज पुरवठा सुरळीत आणि योग्य दाबाने होईल. तसेच स्पार्किंग, आग किंवा जीवितहानीचा धोका टळून नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित होईल, असा विश्वास आमदार जगताप यांनी व्यक्त केला.

> चिंचवड मतदारसंघात येणाऱ्या "जुनी सांगवी परिसरातील वीज समस्येबाबत डीपीडीसी बैठकीत मांडलेल्या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. एनसीएल पाषाण उपकेंद्र ते औंध कर्मचारी वसाहत दरम्यान २२ के.व्ही. नवीन केबल टाकण्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत प्रशासनाने सहकार्याची भूमिका दर्शवली आहे.हे काम लवकरच मार्गी लागणार असून , नागरिकांना अखंडित व सुरक्षित वीज पुरवठ्याचा दिलासा मिळणार आहे.
> **- शंकर जगताप, आमदार, पिंपरी चिंचवड**

## पिंपरी चिंचवड शहर भाजपा युवा मोर्चाच्या वतीने 'अर्थसंकल्प प्रचार

**पिंपरी (दै. संध्या) :**

देशाच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा मांडणाऱ्या केंद्रीय अर्थसंकल्पातील तरतुदी सामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी भाजपा युवा मोर्चा, पिंपरी-चिंचवड शहराच्या वतीने 'अर्थसंकल्प प्रचार-प्रसार संमेलन' आयोजित करण्यात आले होते. या संमेलनात अर्थसंकल्पातील विविध योजना आणि त्याचा युवकांना होणारा फायदा यावर संमेलनाचे प्रमुख वक्ते तथा भाजपा महाराष्ट्र प्रदेश कामगार आघाडी सरचिटणीस हनुमंत लांडगे यांच्या उपस्थितीत व भाजपा शहर अध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या अध्यक्षतेखाली सविस्तर चर्चा करण्यात आली.

हनुमंत लांडगे यांनी, हा अर्थसंकल्प केवळ आकड्यांचा खेळ नसून तो विकसित भारताचा पाया रचणारा आहे. विशेषतः कामगार वर्ग आणि मध्यमवर्गीयांच्या हिताचे रक्षण यामध्ये करण्यात आले आहे. नवीन तंत्रज्ञान आणि कौशल्यावर आधारित रोजगाराच्या संधी यामुळे तरुणांचे भविष्य उज्ज्वल होणार आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

शत्रुघ्न काटे यांनी, युवकांना संबोधित करताना सांगितले की, 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने मांडलेला हा अर्थसंकल्प 'सर्वसमावेशक' आहे. पिंपरी-चिंचवड सारख्या औद्योगिक नगरीतील युवकांनी या योजनांचा लाभ घेऊन उद्योजकतेकडे वळावे. युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी या योजना घराघरात पोहोचवून सामान्यांना सक्षम करावे असे आवाहन केले. शहराच्या विविध भागातून मोठ्या संख्येने युवक आणि नागरिक या संमेलनात सहभागी झाले होते.

## प्रशासन काळातील मोठ्या प्रकल्पांची चौकशी करा - भाऊसाहेब भोईर

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड महानगर पालिकेत प्रशासन काळात झालेल्या मोठ्या प्रकल्पांची प्राधान्याने चौकशी करावी. ५० हजार नागरिकांच्या हरकती येत असतील तर डीपी रद्द करावा. रस्ते लहान करणारा हरित सेतू प्रकल्प रद्द करा. प्रशासनाने अनधिकृत बांधकाम थांबवण्यासाठी, पाणी गळती आणि चोरी रोखण्यासाठी काय केले याची माहिती द्या.

या मागण्यांसह महापौर रवी लांडगे यांनी पाणी पुरवठा २४ तास सुरू करू असे सांगितले आहे. त्यांच्या मताशी मी सहमत आहे. मी विरोधी पक्षनेता असलो तरी विरोधाला विरोध करणार नाही. तर सत्ताधारी आणि विरोधक, नागरिक यांच्यामध्ये समन्वयक म्हणून काम करणार असल्याचे पिंपरी चिंचवड महानगर पालिकेचे विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले.



सोमवारी, मनपा कार्यालयात भोईर यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी भोईर म्हणाले की, आम्ही राज्य सरकार मध्ये महायुतीत सत्तेत आहोत. परंतु येथे विरोधक म्हणून सत्ताधाऱ्यांशी समन्वय साधून शहर विकासासाठी काम करणार आहे. काही अधिकारी निविदा प्रक्रिया विशिष्ट ठेकेदारांना समोर ठेऊन अटी, शर्ती ठरवतात. अनेक अधिकारी तर मनपाचे मालक झालो आहोत अशा आविर्भावात आहेत. शहरात अनेक भागात अजूनही टँकर ने पाणी घ्यावे लागते याला जबाबदार कोण ? अनेक निविदा वाढवून तिजोरीची लूट सुरू आहे. कालांतराने कामगारांच्या पगारासाठी राज्य सरकार वर अवलंबून रहावे लागेल. मनपाची आर्थिक घडी पुन्हा बसवावी लागेल. प्रशासन काळात झालेल्या सर्व बेकायदेशीर कामांची चौकशी करण्यात येईल.

हॉकर झोनचा प्रलंबित प्रश्न प्राधान्याने सोडवावा लागेल. तलाठी, सर्कल ऑफिस, तहसीलदार ऑफिस, पोलिस स्टेशन, पोलिस आयुक्तालय अशा या शहराच्या हद्दीत असणाऱ्या सर्व शासकीय, निमशासकीय, केंद्र सरकारच्या कार्यालयांवर मनपा चा अंकुश पाहिजे. याठिकाणी नागरिकांची कामे वेळेत झाली पाहिजेत. कायदा सुव्यवस्था सुरळीत झाली पाहिजे. नदी सुधार योजनेच्या ऐवजी नद्यांची गटारं झाली आहेत. पर्यावरणाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे प्रदूषणात वाढ झाली आहे. राज्यकर्त्यांनी भानावर येण्याची गरज आहे. आता चुकीच्या कामावर लक्ष ठेऊन सक्षम विरोधी पक्षनेते म्हणून काम करणार असल्याची ग्वाही विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी दिली.

## पीसीसीओई ला बक्षीस मिळणे कौतुकास्पद - विठ्ठल काळभोर

### बाहा - एसएइ इंडिया स्पर्धेत पीसीसीओईचा द्वितीय क्रमांक

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कार्यानुभव आणि औद्योगिक आस्थापना मधील अनुभव मिळावा. तसेच सद्य परिस्थितीत औद्योगिक क्षेत्राची उच्चशिक्षित, तंत्र कुशल मनुष्यबळाची मागणी विचारात घेऊन नियोजन केले जाते. या अंतर्गत अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी देशपातळीवर आयोजित केल्या जाणाऱ्या विविध स्पर्धांमध्ये पीसीसीओइचे विद्यार्थी सहभागी होऊन बक्षीस मिळवतात आणि आपल्या संस्थेचे व महाविद्यालयाचे नाव उंचावतात. हा क्षण प्राध्यापकांबरोबरच पीसीइटीच्या विश्वस्त मंडळाला देखील कौतुकास्पद आहे असे गौरवोउद्गार पीसीटीइटीचे सचिव विठ्ठल काळभोर यांनी काढले. पिथमपुर, मध्य प्रदेश येथील नॅशनल ऑटोमोटिव्ह टेस्ट ट्रॅक्स येथे बाहा एसएई इंडिया - २०२६




या राष्ट्रीय स्पर्धेत पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग (पीसीसीओई) मधील टीम रेड बॅरन च्या विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांकाचे ७५ हजार रुपयांचे पारितोषिक पटकावले. या विद्यार्थ्यांचा सत्कार विठ्ठल काळभोर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओई चे संचालक डॉ. जी. एन. कुलकर्णी, अधिष्ठाता - विद्यार्थी विकास व कल्याण डॉ. पी. ए. देशमुख, सहयोगी अधिष्ठाता अमित पंचवडकर, मार्गदर्शक प्रा. उम्मीद शेख यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या राष्ट्रीय स्पर्धेत देशभरातून १०० पेक्षा अधिक अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या संघांनी सहभाग घेतला होता. 'टीम रेड बॅरन'ने स्टॅटिक आणि डायनॅमिक दोन्ही प्रकारच्या स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली. मॅन्युफॅक्चरिंग एक्सलन्स, सेल्स, एन्ड्युरन्स, मॅन्युव्हरेबिनिटी, ओव्हरऑल डायनॅमिक्स आणि स्टॅटिक्स या प्रकारांमध्ये पहिल्या पाच संघांत पीसीसीओईने स्थान मिळवले. 'टीम रेड बॅरन' मध्ये देवांश रहाटे, इशान भोसले, अंश्रित सुंबळी, प्रणव गोखले, अथर्व चोरगे, तुषार माडीवाला, राज कांगणे, श्रुती दवंगे, पार्थ शिंदे व इतर विद्यार्थ्यांचा समावेश होता. टीमने सादर केलेले इलेक्ट्रिक ऑल-टेरेन व्हेईकल (ई-एटीव्ही) हे स्पर्धेतील एकमेव वाहन होते. ज्यामध्ये खरी फोर - व्हील ड्राइव्ह यंत्रणा वापरण्यात आली होती. या वाहनामध्ये विद्यार्थ्यांनी स्वतः विकसित केलेली २-व्हील ड्राइव्ह, ४-व्हील ड्राइव्ह, डायनॅमिक शिफ्टिंग यंत्रणा समाविष्ट केली होती. त्यासाठी पेटंट अर्ज दाखल करण्यात आला आहे. याशिवाय पूर्णतः विद्यालयामध्येच विकसित व परीक्षण केलेला बॅटरी पॅक आणि संबंधित इलेक्ट्रॉनिक सिस्टिम्स देखील वाहनात वापरले गेले होते.

## 'हिंद-दी-चादर' : समागमाच्या नियोजनासाठी बैठकीचे आयोजन

**पिंपरी (दै. संध्या) :**

'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाच्या निमित्त आयोजित कार्यक्रमाच्या नियोजनासाठी महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली पिंपरी चिंचवड महानगरपालिका मुख्यालयात शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ .३० वाजता विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनामधील दिवंगत माजी महापौर मधुकरराव पवळे सभागृह येथे पार पडणाऱ्या या बैठकीस उप महापौर शर्मिला बाबर, पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्ष नेते भाऊसाहेब भोईर, आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाचा भव्य कार्यक्रम २८ फेब्रुवारी व १ मार्च 2026 रोजी नवी मुंबईतील खारघर येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह गोवा राज्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, राजस्थानचे मुख्यमंत्री भजन लाल शर्मा, आसामचे मुख्यमंत्री डॉ. हिमांता बिस्वा सरमा उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमास पिंपरी चिंचवड शहरातील सिख, सिकलकर,बंजारा, लबाना, सिंधी, महोयाल, वाल्मिकी, उदासीन, भगत नामदेव (वारकी) संप्रदायासह नागरिकही मोठ्या संख्येने गुरू तेग बहादुर यांचा इतिहासाला उजाळा देण्यासाठी एकत्र येतात. पिंपरी चिंचवड शहरातून देखील मोठ्या संख्येने भाविक या समागमामध्ये सहभागी होणार आहेत.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या २०२६-२७ च्या अंदाजपत्रकासाठी आढावा बैठक संपन्न

**बैठकीत नागरी केंद्रीत विकास साधण्यावर देण्यात आला भर**

**पिंपरी (दै. संध्या) :**

अंदाजपत्रक तयार करताना आर्थिक परिस्थिती, पारदर्शकता आणि परिणामकारकता यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. विविध विभागांनी नागरिकांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन नियोजन करावे. नागरी केंद्रित विकास हा महापालिकेच्या कामकाजाचा केंद्रबिंदू राहील आणि त्या दृष्टीने सर्व विकासकामे गुणवत्तापूर्ण व वेळेत पूर्ण करण्यावर भर दिला जाईल. तसेच यामध्ये उपलब्ध संसाधनांचा योग्य व कार्यक्षम वापर करून नागरिकांना अधिक सक्षम व दर्जेदार सुविधा देताना लोकप्रतिनिधींचे सहकार्य देखील प्रशासनाला लाभणार आहे, असे मत आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी व्यक्त केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाचा आढावा घेण्यासाठी दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृह येथे आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी आयोजित केलेल्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस महापौर रवि लांडगे आणि सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे हे उपस्थित होते. तसेच बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, विक्रांत बगाडे, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रविण जैन, नगरसचिव मुकेश कोळप, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, मुख्य आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, सहशहर अभियंता अजय



सुर्यवंशी, मनोज सेटीया, उप आयुक्त अण्णा बोदडे, संदीप खोत, चेतना केरूरे, व्यंकटेश दुर्वास, ममता शिंदे, पंकज पाटील, राजेश आगळे, सहाय्यक आयुक्त अमित पंडीत, सिताराम बहुरे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह संबंधित विभागांचे विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रविण जैन यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचा तपशीलवार आढावा सादर केला. यामध्ये सर्वसाधारण निधीची तरतूद, विविध बँकांमधील मुदत ठेवी, विद्यमान कर्जाची स्थिती, मागील चार वर्षांतील जमा खर्च, मासिक महसुली खर्चाची आवश्यकता, अस्थायी अस्थापनेवरील कर्मचाऱ्यांची संख्या व त्यांना देण्यात येणारे मानधन, दायित्व निधी, मुद्रांक शुल्क व अन्य उत्पन्नाचा गोषवारा तसेच करसंकलन विभागाची मागील तीन वर्षांची आणि चालू वर्षातील कामगिरी यांचा समावेश होता. यासोबतच विविध विभागांना प्रस्तावित निधीची तरतूद, अंतिम टप्प्यात असलेली विकासकामे आणि नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. शहराचा विकास हा नागरिकांच्या जीवनमानाशी थेट जोडलेला आहे. नागरी केंद्रित विकास साधायचा असेल तर प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यात प्रभावी समन्वय आवश्यक आहे. अंतिम टप्प्यातील कामे प्राधान्याने पूर्ण करून नागरिकांना त्याचा लाभ मिळाला पाहिजे. वाढती लोकसंख्या लक्षात घेता पाणीपुरवठा, आरोग्य व वैद्यकीय सुविधा बळकट करणे अत्यावश्यक आहे. पर्यावरण, आरोग्य, क्रीडा आणि वैद्यकीय सेवा या मुख्य क्षेत्रांवर भरीव तरतूद करून प्रत्येक घटकापर्यंत सुविधा पोहोचतील, याची हमी देणारे अंदाजपत्रक सादर करणे गरजेचे असून सर्वसामान्य नागरिकांचे समाधान हेच प्रशासन व लोकप्रतिनिधी यांचे अंतिम ध्येय असावे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### समाधान अवचट यांच्यावतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : लहान मुले ही देवघरची फुले आहेत आणि जेव्हा त्यांना एखादी वस्तू किंवा साहित्य असो अथवा खाऊ असो हे त्यांना अचानकपणे प्राप्त झाल्यास त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळं स्मितहास्य निर्माण होते त्यावेळी त्या कोवळ्या मुलांना भेटवस्तू देणाऱ्या व्यक्तींना सुध्दा मनोमन आत्मीय समाधान मिळते. वाढदिवसाचा खर्च नाहकपणे करुन उधळपट्टी करण्यापेक्षा हाच पैसा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यात उपयोगात आणून त्यांच्या गरजा पूर्ण केल्या तर विद्यार्थ्यांची शालेय गोडी वाढून त्यांच्या गरजा पूर्ण होवू शकतात. हा उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून नेहमी सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे कार्यक्रमाचे उत्तम सूत्रसंचालन तसेच निवेदक ची भूमिका निभवणारे समाधान अवचट यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त कोरेगावमुळ (ता.हवेली) येथे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दासवे वस्ती मधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करुन वाढदिवस साजरा केला. यावेळी पै.शुभम काळे, उद्योजक किरण भंडारी, सुवर्णा कांचन, बापुसो चौधरी, नितीन लोंढे, केतन निकाळजे, अजित पाटोळे, अक्षय कोळपे, सागर रगडे, सागर निंबाळकर,आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणेश मेमाणे सर यांनी केले तर सूत्रसंचालन सुनिल तुपे यांनी केले. आभार निवेदक समाधान अवचट यांनी मानले. माझं शिक्षणही याच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झाले व या शाळेच्या संस्कारातून समाजात चांगले आई - वडील व असंख्य हितचिंतक शुभचिंतक मित्रपरिवार यांच्या माध्यमातून काम करत आहे यांचे समाधान आहे.

### फत्तेश्वर रोड नजीक दिवसा धाडसी चोरी : सुमारे पाच लाखांचा ऐवज चोरीस



कवठे येमाई (दैनिक संध्या) : शिरूर तालुक्याच्या पश्चिमेकडील कवठे येमाई च्या फत्तेश्वर महादेव मंदीर रोड जवळ वास्तव्यास असणारे शरद सुनील गायकवाड यांच्या बंद घराचे अज्ञात चोरट्यांनी भर दिवसा घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करीत धाडसी चोरी केली आहे. ही घटना बुधवार दि.११ ला दुपारी ११ ते ३ च्या दरम्यान घडली असल्याची माहिती शरद गायकवाड यांनी दिली. शरद गायकवाड शेतीच्या कामानिमित्ताने काल बुधवारी सकाळी ९ लाच कवठे येथून नातलग व कुटुंबासह शिरूर तहसील कार्यालय गेले होते.दरम्यान दुपारी दोन वाजता त्यांच्या वस्तीवरून तुमचे घर उघडे असून चोरी झाल्याचा प्रकार घडल्याची माहिती नजीकच्या माणसाने त्यांना फोन करून दिली.शरद यांनी तात्काळ कवठे येमाई येथे घरी पोहचत घडलेल्या घटनेची माहिती स्थानिक पोलीस पाटील गणेश पवार व शिरूर पोलिसांना दिली. भर दुपारी घडलेल्या या चोरीच्या घटनेत चोरट्यांनी घरातील सुटकेस,पेटी उचकटत त्यातील सोन्याचे साडेतीन तोळे सोने,चांदीचे दागिने,कागदपत्रे व रोख साडे हजार लांबवीले.या धाडसी चोरीत गायकवाड यांना सुमारे ५ लाख रुपयांचा फटका बसल्याचा अंदाज व्यक्त होत असून परिसरात एकच खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस पाटील गणेश पवार व शिरूर पोलिसांचे पथक काल सायंकाळीच घटनास्थळी दाखल झाले.घटनेची माहिती घेत पंचनामा करण्यात आला असून आज सकाळी ११ च्या दरम्यान श्वान पथक व ठसे तज्ज्ञ घटना स्थळी दाखल झाल्याची माहिती मिळाली. या दिवसाच घडलेल्या धाडसी चोरीचा पुढील तपास शिरूरचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक दिलीप पवार व सहकारी करीत आहेत.



### परीक्षेला न घाबरता आत्मविश्वासाने सामोरे जा यश तुमचेच : प्राचार्य नंदकुमार सागर

हवेली(दैनिक संध्या) : आज तुमच्या समोर दहावीची परीक्षा उभी आहे. काहींना भीती वाटत असेल.तर काहींना आत्मविश्वास असेल पण लक्षात ठेवा परीक्षा तुमचे सामर्थ्य मोजते तुमची किंमत नाही. म्हणून परीक्षेला न घाबरता आत्मविश्वासाने सामोरे जा यश तुमचेच आहे.असे मत महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे सचिव राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श प्राचार्य नंदकुमार सागर यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना विचार व्यक्त केले. पुरोगामी माध्यमिक विद्यालय नायगाव ता.हवेली या विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेला जाताना शुभेच्छा कार्यक्रमाचे आयोजन केले होते.या कार्यक्रमाचे अध्यक्ष बाळासाहेब चोरघे, प्रमुख पाहुणे प्राचार्य नंदकुमार सागर, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श निवृत्त मुख्याध्यापक कुंडलीकराव मेमाणे, संस्थेचे सचिव रंगनाथ आप्पा कड, विश्वस्त सोनबा चौधरी, दत्तात्रय चौधरी,अनिल लोणकर, शिवाजी चौधरी, सुनील चोरघे, राजेंद्र चौधरी,राघवदास चौधरी, अजित जगताप हे उपस्थित होते. शुभेच्छा देताना सागर सर पुढे म्हणाले की इतिहास साक्षी आहे जगातील थोर व्यक्तीमत्व ही सामान्य विद्यार्थी दशेतूनच घडली आहेत.सोळावं वर्षे हे धोक्याचे नाही तर ते काहीतरी अफाट आणि उंच भरारी घेण्याचे आहे.छत्रपती शिवाजी महाराजांनी सोळाव्या वर्षी स्वराज्य स्थापन्याची शपथ घेतली, ज्ञानेश्वरांनी सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरी सांगितली. तसेच प्रतिकुल परिस्थितीचा बाऊ न करता त्याच्याशी दोन हात करा डॉ बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले, डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांनी यांनी प्रतिकुलतेला ताकद बनविले आणि आपलं ध्येय साध्य केले.म्हणून जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर योग्य शिक्षण दृढ निश्चय, सातत्य पूर्ण परिश्रम, स्वप्न पाहण्याची हिंमत, आणि राष्ट्रासाठी काहीतरी करण्याची तळमळ ठेवा अशा शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष बाळासाहेब चोरघे यांनी शुभेच्छा देताना सांगितले शिक्षकांनी तुम्हाला जीवनभर पुरेल इतकी ज्ञानाची शिदोरी दिली आहे.त्याचा सद्सद्विवेक बुद्धीने वापर करा आणि जीवन सुफल,सफल बनवा व दहावीच्या वर्गाचा विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लावा याच शुभेच्छा.यावेळी विद्यार्थ्यांनाही मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक प्रवीण गायकवाड यांनी केले, सुत्रसंचलन रोहिदास बिचकुले यांनी केले तर आभार रोहिणी म्हेत्रे यांनी मानले.या कार्यक्रमाचे नियोजन , सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने सांस्कृतिक विभागाने केले.

# शिरूर तालुक्यातील बेट भागात चोरट्यांचा धुमाकूळ



**चार दिवसांत पाच रोहित्र फोडले : नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट**

**कवठे येमाई (दै. संध्या)**

शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी पोलिस दूरक्षेत्राच्या हद्दीत गेल्या काही दिवसांपासून चोरट्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातला असून शिरूरच्या बेट भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मलठण, कवठे येमाई आणि सविंदणे परिसरात चोरट्यांनी अवघ्या चार दिवसात पाच विद्युत रोहीत्र फोडून त्यातील तांब्याच्या तारांची चोरी करण्यात आली आहे. तर दुसरीकडे कालच कवठे येमाई येथे भरदिवसा बंद घराचे कुलूप तोडून सोन्या-चांदीसह रोख रक्कम लंपास करण्यात आल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

मलठण येथील अष्टविनायक महामार्गालगत कॅनॉल रोडवरील विद्युत रोहित्र शुक्रवारी (दि. ६) मध्यरात्री फोडण्यात आले. चोरट्यांनी रोहित्रातील ऑईल खाली सांडवून आतील तांब्याच्या तारांवर डल्ला मारला. याप्रकरणी महावितरणचे वरिष्ठ तंत्रज्ञ इंद्रजित दामोदर खरसाडे (रा. मलठण, ता. शिरूर) यांनी शिरूर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

या घटनेनंतर सोमवारी (दि. ९) मिडगुलवाडी येथील गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीवरील रोहित्र फोडण्यात आले. त्याच दिवशी सविंदणे येथील डोंगर भागात कान्हूर मेसाई रस्त्यालगत असलेले रोहित्र ही चोरट्यांनी लक्ष्य केले. दुसऱ्याच दिवशी कवठे येमाई च्या गणेशनगर परिसरातील वेल्डिंग केलेले रोहित्र फोडून त्यातील तांब्याच्या तारांची चोरी करण्यात आली. सतत घडणाऱ्या या चोरीच्या घटनांमुळे कवठे येमाई, सविंदणे व मलठण परिसरातील वीजपुरवठा विस्कळीत झाला आहे.

वीज नसल्याने पिकांना पाणी देणे अडचणीचे बनले असून शेतकरी हवालदिल झाले आहेत. "वीज नसल्यामुळे पिकांचे मोठे नुकसान होत आहे. पोलिसांनी या घटनांचा तात्काळ छडा लावून तातडीने कारवाई करावी," अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. दरम्यान, कवठे येमाई (ता. शिरूर) येथे फत्तेश्वर मंदिराजवळील शरद सुनील गायकवाड यांच्या बंद घराचे भरदिवसा कुलूप तोडून चोरट्यांनी सुमारे साडे तीन तोळे सोने, चांदीचे दागिने व सुमारे साडे सहा हजार रुपये रोख रक्कम लंपास केली.

बेट भागात होत असलेल्या सलग वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. विशेषतः रोहित्र चोरीमुळे शेती आणि पाणीपुरवठ्यावर थेट परिणाम होत असल्याने ग्रामस्थांनी पोलिसांनी नियमित रात्रगस्त वाढवावी, संशयितांवर लक्ष ठेवावे आणि चोरट्यांचा तातडीने बंदोबस्त करावा अशी जोरदार मागणी केली आहे.

## कल्पना काळे यांनी राखला जुन्नरमधील राष्ट्रवादीचा गड

**आळेफाटा (दै. संध्या)**

जुन्नर तालुक्याच्या पूर्व भागातील बोरी- खोडद गटामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या कल्पना वैभव काळे यांनी विजय मिळवला. त्यांनी शिवसेनेच्या जयश्री खंडागळे यांचा १६३२ मतांनी पराभव केला. हा नवीन जिल्हा परिषद गट असून, या गटांमध्ये तालुक्याचे माजी आमदार अतुल बेनके यांनी शोकसभेत गावोगावी जाऊन मतदारांना आवाहन केले होते की, उपमुख्यमंत्री अजित पवारांनी उभे केलेले शेवटचे उमेदवार आहेत, त्यांना निवडून द्या. त्याचा परिणाम या गटातील मतदारांवर झाला असल्याची चर्चा आहे. या गटामध्ये तिरंगी लढत झाली. कल्पना काळे, जयश्री खंडागळे (शिवसेना शिंदे) व कविता पवार (अपक्ष) उमेदवार या तिघांमध्ये लढत झाली. जुन्नर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष पांडुरंग पवार यांच्या सून कविता पवार यांनी अपक्ष निवडणूक लढवली, तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातून शिवसेनेत गेलेले माउली खंडागळे यांच्या पत्नी जयश्री खंडागळे यांना मतदारांनी डावलल्याचे दिसून आले या गटातील बोरी गणामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या संभाजी चव्हाण यांचा ७६९ मतांनी विजयी झाला. संभाजी चव्हाण यांची जनसामान्यासी जोडली गेलेली नाळ व त्यांचे सामाजिक कार्य, पारगाव ग्रामपंचायतीचे नाव जिल्ह्यामध्ये पुढे नेण्यासाठी त्यांचे कार्य कौतुकास्पद आहे. त्यांनी शिवसेनेच्या (शिंदे) राजकुमार गाडगे यांचा पराभव केला. तर, खोडद गणात शिवसेनेच्या (शिंदे) माधुरी निलख यांचा १३५९ मतांनी विजय झाला. त्यांनी राष्ट्रवादीच्या प्रगती बढे यांचा पराभव केला. "बोरी- खोडद जिल्हा परिषदेच्या गटात जिल्हा परिषद सदस्यपदासाठी तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार डॉ. अमोल कोल्हे व माजी आमदार अतुल बेनके यांच्या मार्गदर्शनाखाली मला तिकीट देण्यात आले होते. मी बोरी खुर्द गावच्या सरपंचपदी काम करत असताना नेहमी सर्वसामान्य जनतेला नेहमी न्याय द्यायचे काम केले. त्यामुळे या गटातील मतदारांनी भरघोस मतांनी निवडून दिले आहे.

## ३,५०० हून अधिक जीवनांत उजेड : "कायापालट" नांदेडची सामाजिक ओळख

**नांदेड (दै. संध्या)**



रस्त्यावर उपेक्षित आयुष्य जगणाऱ्या निराधारांच्या चेहऱ्यावर पुन्हा आत्मविश्वास फुलवणारा "कायापालट" हा उपक्रम सोमवारी ७१ व्या महिन्यातही तितक्याच तळमळीने पार पडला.धर्मभूषण ॲड.दिलीप ठाकूर यांच्या पुढाकारातून ५३ भ्रमिष्टांना स्वच्छतेसोबतच सन्मानाचे जीवन मिळवून देण्यात आले. केस-दाढी वाढून ओळखही पुसली गेलेली,अनेक महिने अस्वच्छतेत राहिलेली ही माणसे या उपक्रमामुळे अक्षरशः ओळखू न येण्याइतपत बदलली. मोफत दाढी-कटिंग,साबणाने स्नान,नवीन कपडे,चहा-फराळ व प्रत्येकी १०० रुपयांची बक्षिसी देत त्यांना "आपणही समाजाचा भाग आहोत" हा विश्वास देण्यात आला.गेल्या ७१ महिन्यांत ३,५०० हून अधिक बेघर, भिकारी व मानसिक आजारग्रस्त व्यक्तींच्या जीवनात सकारात्मक बदल घडवणारा हा उपक्रम आता नांदेडची सामाजिक ओळख ठरत आहे.मा.मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण,खा.डॉ.अजित गोपछडे, भाजपा प्रदेश संघटन मंत्री संजय कोडगे,भाजपा अध्यक्ष अमरनाथ राजुरकर,डॉ.संतुकराव हंबर्डे,ॲड. किशोर देशमुख व लायन्स उपप्रांतपाल योगेश जायस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा महानगर नांदेड,लायन्स क्लब नांदेड सेंट्रल, सन्मित्र फाउंडेशन आणि अमरनाथ यात्रेकरू संघ यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविला जातो.सुरेश शर्मा,अरुण काबरा,प्रभुदास वाडेकर, महेंद्र शिंदे यांनी शहरातील विविध रस्त्यांवरून योग्य लाभार्थ्यांची निवड केली.राजू अण्णा पुसनूर व प्रसाद या स्वयंसेवकांनी दाढी-कटिंग केली. स्नानासाठी आवश्यक पाण्याची व्यवस्था कामगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष सुरेश लोट यांनी केली. डॉ.अर्जुन मापारे यांनी मोफत आरोग्य तपासणी करून औषधोपचार दिले तर स्नेहलता जायस्वाल,जयश्री ठाकूर व बाबुलाल यादव यांच्या हस्ते सर्वांना नवीन कपडे देण्यात आले.या कार्यक्रमा नंतर गोवर्धन घाट परिसराची स्वच्छता करून "स्वच्छता हीच खरी सेवा" हा संदेश देण्यात आला.

येत्या मार्च महिन्याच्या पहिल्या रविवारी शहरात असहाय्य,मानसिक आजारग्रस्त किंवा उपेक्षित व्यक्ती आढळल्यास भाजप किंवा लायन्स क्लबच्या सदस्यांशी संपर्क साधावा, असे आव्हान संयोजक ॲड.दिलीप ठाकूर यांनी केले आहे.

## नांदेडमध्ये हास्य, काव्य आणि बक्षिसांची मेजवानी

**नांदेड (दै. संध्या)**



भारतीयांवर असलेला लेटलेटीफचा शिक्का पुसण्यासाठी " कुबेरनगरी मौजे लोंढेसांगवी प्रस्तुत नरेंद्र-देवेंद्र महोत्सव २०२६ " मध्ये वेळेवर उपस्थित राहणाऱ्या रसिकांना भाजपा कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष सुरेश लोट यांच्या तर्फे दहा कलर टी.व्ही. देण्यात येणार आहेत अशी माहिती स्वागताध्यक्ष शिवप्रसाद राठी व महोत्सवाचे संयोजक धर्मभूषण ॲड.दिलीप ठाकूर यांनी दिली आहे. कै.चंद्रभागा केरबा गंजेवार नगरी, नवा मोंढा मैदान नांदेड येथे होणाऱ्या "कुबेरनगरी मौजे लोंढेसांगवी प्रस्तुत नरेंद्र देवेंद्र महोत्सवात "२१ फेब्रुवारी रोजी पहिल्या दिवशी १४ वा मराठी हास्य दरबार भरविण्यात येणार आहे. या हास्य दरबारात स्टँडअप कॉमेडीचे बादशहा बंडा जोशी,झी हास्य सम्राट सिद्धार्थ खिल्लारे तसेच लोकप्रिय शाहीर रमेश गिरी हे आपल्या विनोदी सादरीकरणातून रसिकांचे भरभरून मनोरंजन करणार आहेत तसेच चला हवा येऊ दे फेम सतीश कासेवार यांचा खास महिलांसाठी होम मिनिस्टर – खेळ पैठणीचा हा मजेशीर कार्यक्रम घेण्यात येणार आहे.याच दिवशी रमेश पारसेवार, ॲड.गजानन पिंपरखेडे,रत्नाकर वाघमारे व गंगाप्रसाद तोष्णीवाल यांना नांदेड भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे तर सुधाकर पत्रभूषण पुरस्कार प्राप्त मान्यवरांमध्ये पन्नालाल शर्मा,अभय कुळकजाईकर,चारुदत्त चौधरी, संतोष पांडागळे व रामेश्वर काकडे यांचा समावेश आहे.२२ फेब्रुवारी रोजी महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी २४ वे अखिल भारतीय विराट कविसंमेलन आयोजित करण्यात आले आहे.या कविसंमेलनात मेरठ (उत्तर प्रदेश) येथील हास्य संचालक व क्रांती कवी सौरभ जैन सुमन, जबलपूर (मध्य प्रदेश) येथील हास्य गीतकार सुदीप भोला,भिलवाडा (राजस्थान) येथील हास्य व्यंग्य कवी दीपक पारेख,मैनपुरी (उत्तर प्रदेश) येथील वीर रस कवी डॉ.मनोज चौहान,सुरत (गुजरात) येथील शृंगार रसाच्या कवयित्री सोनल जैन तसेच दिल्लीच्या वीर रस कवयित्री नेहा शर्मा 'नमन' यांचा सहभाग असणार आहे.याच कार्यक्रमात मा.मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण यांना नांदेड भूषण पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.कुबेरनगरी मौजे लोंढेसांगवी प्रस्तुत नरेंद्र देवेंद्र महोत्सवाच्या प्रत्येक दिवशी सायंकाळी ठीक पाच वाजता कार्यक्रमस्थळी उपस्थित असलेल्या रसिकांमधून सोडतीद्वारे दररोज पाच कलर टी.व्ही.असे एकूण दहा कलर टी.व्ही.वितरित करण्यात येणार आहेत.या सोडतीमध्ये पत्रकारांनाही सहभागी करून घेण्यात येणार आहे.रसिकांनी कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी प्रवेशद्वारावर उपस्थित स्वयंसेवकांकडून शिक्का मारूनच मैदानात प्रवेश करावा असे आव्हान आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## वीरधवल जगदाळे यांना हॅट्रीक भाजपमधील नाराजीमुळे सोपी

**देऊळगाव राजे (दै. संध्या)**

दौंड तालुक्यातील खडकी-देऊळगाव राजे गटात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून निवडणूक लढवून वीरधवल जगदाळे यांनी विजयाची हॅट्रिक केली. निवडणूक काळात अजित पवार यांचे निधन झाले. प्रचारात सहानुभूती मिळवत कार्यकर्त्यांनी एकजुटीने प्रचार केला. यामध्ये अजित पवार यांनी केलेली विकास कामे, तसेच वीरधवल जगदाळे यांनी भाजपच्या नाराज कार्यकर्त्यांना खेचण्यात यश मिळविले. त्यामुळे मोठ्या फरकाने ते विजयी झाले. दौंडच्या राजकारणात एकापाठोपाठ विजय मिळवल्याने जगदाळे राजकारणातील धुरंदर असल्याची चर्चा कार्यकर्त्यांमध्ये आहे. खडकी- देऊळगाव गटात भाजपचे ज्येष्ठ नेते वासुदेव काळे यांच प्रस्थ आहे. या गटात त्यांना मानणारा मोठा वर्ग आहे. भाजपने वरिष्ठ पातळीवर वासुदेव काळे यांची मुलगी डॉ. हर्षदा काळे यांची उमेदवारी निश्चित केली होती. मात्र, अर्ज भरण्याच्या दिवशी नाट्यमय घडामोडी घडल्या व उमेदवारी नाकारण्यात आली. त्यामुळे त्यांच्या कार्यकर्त्यांना नाराज होऊन परतावे लागले. भाजपने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष अप्पासाहेब पवार यांना उमेदवारी दिली. मात्र, उमेदवारी देताना वासुदेव काळे यांना अंधारात ठेवण्यात आले. त्यामुळे भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते या प्रक्रियेतून बाजूला असल्याचे चित्र होते. शिवाय प्रचारातील फलकांवरही वासुदेव काळे यांचे छायाचित्र वापरले नाही. नाराज कार्यकर्त्यांना विश्वासात घेण्यात भाजपचे उमेदवार आप्पासाहेब पवार कमी पडले. त्यामुळे त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. या निवडणुकीत अजित पवार यांच्या निधनामुळे मोठ्या सभा घेण्यात आल्या नाहीत. एकमेकांवर कुठेही टीकाटिप्पणी करताना दिसले नाही.

# मेगदे गुरुजी व्याख्यानमालेत दिलीप ठाकूर यांना १०८ वा पुरस्कार प्रदान

**नांदेड (दै. संध्या)**



यमुना प्रतिष्ठान मुदखेड यांच्या वतीने आयोजित कै.गणपतराव मेगदे गुरुजी स्मृती व्याख्यानमालेच्या तेराव्या पुष्पात ख्यातनाम वक्ते प्रा. युवराज पाटील यांनी "चला कुटुंब जपूया" या विषयावर अत्यंत प्रभावी व विचारप्रवर्तक व्याख्यान दिले. या वेळी रोख रक्कम ₹ 11,000 देऊन डॉ.जयश्री देशमुख यांना कै. शकुंतलाबाई मेगदे सेवा गौरव पुरस्कार व धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांना कै.गणपतराव मेगदे सेवा गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.कुसुम सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास श्रोत्यांची मोठी उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस कै. शकुंतलाबाई व कै.गणपतराव मेगदे यांच्या प्रतिमेचे पूजन करून मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेडचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुनील वेदपाठक हे होते,तर प्रमुख अतिथी म्हणून नांदेड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. आशिष गोधमगावकर,सर्पतज्ञ डॉ.दिलीप पुंडे हे उपस्थित होते. यमुना प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड.उमेश मेगदे व संचालिका सौ.सुमित्रा मेगदे यांनी मान्यवरांचे स्वागत केले.सचिव रमेश मेगदे यांनी प्रास्ताविकातून स्मृती व्याख्यानमालेमागील भूमिका व उद्देश स्पष्ट केला.यावेळी देण्यात आलेल्या पुरस्काराचे स्वरूप प्रत्येकी रोख रुपये ११,०००,मानपत्र व स्मृतिचिन्ह असे होते.सत्काराला उत्तर देताना धर्मभूषण ॲड.दिलीप ठाकूर यांनी "मला मिळालेला हा १०८ वा पुरस्कार केवळ माझा नसून तमाम नांदेडकरांचा आहे," असे सांगून पुरस्काराच्या रक्कमेतील निधीतून कायापालट उपक्रमातील गरजूंसाठी कपडे खरेदी करण्याची घोषणा केली. डॉ.जयश्री देशमुख यांनी पुरस्काराची रक्कम वसरणी येथील निवासी अंध विद्यालयाला दिली.अध्यक्षीय समारोप सुनील वेदपाठक यांनी केला व त्यानंतर सुरेश मेगदे यांच्या सुमधुर आवाजातील पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.या कार्यक्रमाचे प्रभावी व रंगतदार संचालन ॲड.गजानन पिंपरखेडे यांनी केले तर आभार प्रदर्शन सौ. मधुरा शेखर मेगदे यांनी मानले. मेगदे परिवारातर्फे सर्व श्रोत्यांसाठी रुचकर भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेडिसन फार्मा प्रायव्हेट लिमिटेड,कलांगण प्रतिष्ठान नांदेडचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.मोबाईलच्या युगातही व्याख्यान मालेसारखी वैचारिक परंपरा जपल्याबद्दल यमुना प्रतिष्ठान व मेगदे परिवाराचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.

# गुरु तेग बहादुर आणि संत नामदेव : मूलभूत विचारांची समानता

मुंबई (दै. संध्या)

■ प्रभाकर बारहाते, प्र. जिल्हा माहिती अधिकारी, हिंगोली

संत नामदेव महाराज आणि श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्यात जरी तीन शतकांचे कालांतर असले, तरी सत्य, निर्भयता, मानवी स्वातंत्र्य, सामाजिक समता आणि ईश्वरभक्तीची सार्वत्रिक भावना ही दोघांच्या विचारधारेची समान सूत्रे आहेत. 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त विशेष उपक्रम हा या महान परंपरेचे स्मरण करून देणारा व भावी पिढीसाठी प्रेरणादायी ठरणारा उपक्रम आहे.

भारतीय सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरा ही विविध संत, गुरू आणि विचारवंतांच्या योगदानातून समृद्ध झालेली आहे. या परंपरेत महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचे अग्रणी संत नामदेव महाराज (इ.स. १२७०–१३५०) आणि शीख धर्माचे नववे गुरु, श्री गुरु तेग बहादुर साहिब (इ.स. १६२१–१६७५) हे दोन युगपुरुष वेगवेगळ्या काळात जन्मले. या दोघांमध्ये सुमारे तीन शतकांचे कालांतर असले, तरी त्यांच्या जीवनकार्याचा आणि तत्त्वज्ञानाचा अभ्यास केल्यास मूलभूत विचारधारेत लक्षणीय समानता आढळून येते. ही समानता अधोरेखित करण्याच्या दृष्टीने नांदेड येथे आयोजित करण्यात आलेला 'हिंद-दी-चादर' हा विशेष उपक्रम महत्त्वपूर्ण ठरतो.

हिंद-दी-चादर श्री गुरू तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमाचे आयोजन राज्यभर करण्यात आले. नागपूर आणि नांदेड येथे अल्पसंख्याक विकास विभाग, राज्यस्तरीय समन्वय समिती आणि शीख सिकलीगर, बंजार, लबाना, मोहयाल, सिंधी, वाल्मिकी, उदासीन व भगत नामदेव संप्रदाय समुदायाच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. यावेळी लाखोंच्या संख्येने भाविक राज्य, देशभरातून आले होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून युवा पिढीपर्यंत गुरू तेग बहादुर यांचा शौर्याचा इतिहास पोहाचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी खारघर, नवी मुंबई येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

संत नामदेव महाराजांनी आपल्या अभंगांच्या माध्यमातून भक्ती, सत्य, साधेपणा आणि मानवी समता यांचा पुरस्कार केला. त्यांनी जात, वर्ण आणि कर्मकांडांवर आधारित भेदभावाला ठाम विरोध केला. "ईश्वर सर्वत्र आहे" ही भावना त्यांच्या विचारांचे केंद्रबिंदू होती. त्याचप्रमाणे श्री गुरु तेग बहादुर साहिब यांनीही ईश्वर एक असून तो सर्व मानवांचा आहे, असा सार्वत्रिक दृष्टिकोन मांडला. त्यांनी धार्मिक असहिष्णुता, अन्याय आणि जबरदस्तीविरुद्ध उभे राहून मानवमूल्यांचे संरक्षण केले.

निर्भयता, सत्यनिष्ठा आणि बलिदान संत नामदेव महाराजांनी सामाजिक अन्यायाविरोधात निर्भयपणे आवाज उठविला. सत्य आणि नामस्मरण हाच खरा धर्म असल्याचे त्यांनी आपल्या रचनांमधून स्पष्ट केले.

श्री गुरु तेग बहादुर साहिब यांनी सत्य, संस्कृतीचे रक्षण आणि मानवी स्वाभिमान यांसाठी सर्वोच्च बलिदान दिले. संत नामदेवांनी माणसाच्या अंतःकरणातील शुद्धता आणि आत्मसन्मान यांना सर्वोच्च स्थान दिले. बाह्य औडंबरापेक्षा अंतर्गत भक्ती व नैतिकता महत्त्वाची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. गुरु तेग बहादुर साहिब यांनी व्यक्तिस्वातंत्र्य, विशेषतः धार्मिक स्वातंत्र्य, हा मानवी जीवनाचा मूलभूत अधिकार असल्याचा संदेश आपल्या आचरणातून दिला.

नागपूर, नांदेड येथे श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या ३५० व्या शहीदी समागम निमित्त आयोजित केलेला 'हिंद-दी-चादर' हा विशेष उपक्रम सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता आणि सर्वधर्मसमभाव यांचा संदेश देणारा आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून गुरु तेग बहादुर साहिब यांच्या त्याग, बलिदान व मानवतावादी विचारांचा प्रसार करण्यात आला. त्याचबरोबर महाराष्ट्राच्या संत परंपरेतील संत नामदेव महाराजांच्या विचारांशी असलेली वैचारिक समानता अधोरेखित करण्यात आली.

संत नामदेव महाराज आणि गुरु तेग बहादुर साहिब यांच्या विचारधारेमुळे समाजात सहिष्णुता, बंधुता आणि समतेची भावना दृढ झाली. या दोन्ही महापुरुषांचे विचार आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीतही मार्गदर्शक ठरतात.

'हिंद-दी-चादर' या उपक्रमातून विविध धर्म, पंथ आणि समाजघटकांमध्ये परस्पर सन्मान व समन्वयाची भावना वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.



# श्री गुरु तेग बहादूर मानवजातीचे खरे तारणहार

'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या शहिदीला ३५० वर्ष पुर्ण होत असल्याने महाराष्ट्र शासन आणि श्री गुरु तेग बहादूर साहिबजी ३५० वा शहिदी समागम राज्यस्तरीय समितीमार्फत खारघर, नवी मुंबई येथे २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी रोजी कार्यक्रम होत आहे. या निमित्ताने श्री गुरु तेग बहादूरजी यांच्या मानवजातीच्या कल्याणासाठी केलेल्या अनमोल कार्याची ही माहिती...

संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, पुणे

(दै. संध्या) महान योद्धा, आध्यात्मिक व्यक्तिमत्त्व आणि मातृभूमीचे प्रेमी नववे शीख गुरू श्री गुरु तेग बहादूरजी यांनी केलेल्या सर्वोच्च बलिदानाची मानवता सदैव ऋणी राहील. त्यांनी विश्वबंधुता आणि धार्मिक स्वातंत्र्याचा संदेश दिला. धर्म, मातृभूमी आणि लोकांच्या हक्कांसाठी त्यांनी जाती-धर्माचा विचार न करता सर्वस्वाचा त्याग केला. म्हणूनच त्यांना 'हिंद दी चादर' या दुर्मिळ सन्मानाने गौरवण्यात आले. आपण श्री गुरु तेग बहादूरजींचा ३५० वा शहिदी समागम वर्ष साजरा करत असताना, धार्मिक स्वातंत्र्याचे महत्त्व आणि मानवजातीच्या व मातृभूमीच्या कल्याणाविषयी शिकवण देणाऱ्या त्यांच्या महान आदर्शांना पुन्हा समर्पित करणे आवश्यक आहे.

अतुलनीय श्री गुरु तेग बहादूरजींनी आपल्याला निर्भयपणे मुक्त जीवन जगण्याची शिकवण दिली. मुघल सम्राट औरंगजेबाने त्यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबावर केलेल्या अत्यंत छळास ते शरण गेले नाहीत, तर दैवी शांततेने तो सहन केला. त्यागमल ते तेग बहादूर असे झालेले त्यांचे परिवर्तन मानवी इतिहासात फार कमी समांतर असलेली धार्मिक दृढता, औचित्य, नैतिकता आणि शौर्याची कथा आहे. त्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, पण सत्याचा मार्ग सोडला नाही. त्यांच्या देवत्वाची अशी शक्ती होती की जेव्हा त्यांच्या शिष्यांना त्यांच्या समोर मारण्यात आले, तेव्हा ते खोल ध्यानात राहिले. जेव्हा त्यांनी स्वतः परम त्याग केला, तेव्हाही ते ध्यानात मग्न होते. श्री गुरु तेग बहादूरजी म्हणाले की धर्म हा केवळ पूजा-पाठ नसून कर्तव्य आहे आणि एक आदर्श जीवनपद्धती आहे.

आजच्या तरुण पिढीने श्री गुरु तेग बहादूरजींच्या जीवनातून, चारित्र्यातून आणि त्यागातून प्रेरणा घेऊन मानवता आणि नैतिक मूल्ये अंगीकारण्याची गरज आहे, जेणेकरून भारत पुन्हा विश्वगुरू होईल. अत्याचार आणि अन्यायापुढे झुकण्यास त्यांनी ठाम नकार दिला. त्यांनी आदर्श आणि तत्त्वांच्या मार्गावर चालण्याची निवड केली. काश्मिरी पंडितांचे एक शिष्टमंडळ श्री गुरु तेग बहादूरजींना भेटण्यासाठी आजच्या श्री आनंदपूर साहिब येथे आले, ज्याला चक्क नानकी असेही म्हणतात. त्यांचे म्हणणे धीराने ऐकून घेतल्यानंतर, त्यांनी त्यांना औरंगजेबाला किंवा त्याच्या माणसांना सांगण्यास सांगितले की जर त्यांचे गुरू धर्म सोडतील, तरच ते आपला धर्म सोडतील.

त्यानंतर औरंगजेबाने केलेले कारनामे इतके भयानक होते की आजही त्यांची आठवण झाल्यावर अंगावर काटा उभा राहतो. श्री गुरु तेग बहादूरजी आणि त्यांच्या तीन भक्तांना -भाई सती दास, भाई मती दास आणि भाई दयाला - बंदिवान करण्यात आले. त्यांनी इस्लाम स्वीकारण्यास नकार दिल्यावर त्या उदात्त त्रिकूटांना त्यांच्या गुरूसमोर फाशी देण्यात आले. त्यांनी धर्मासाठी सर्वोच्च बलिदान दिले. इ.स. १६७५ मध्ये श्री गुरु तेग बहादूरजींनी अत्यंत शांतपणे हौतात्म्य पत्करले. जुन्या दिल्लीतील चांदणी चौकातील गुरुद्वारा शीशगंज साहिब हे 'त्याग' आणि 'बलिदान' यांच्या अंतिम गाथेचे प्रतीक आहे, ज्याला मानवी इतिहासात तोड नाही. भाई जैता सिंग यांनी श्री गुरु तेग बहादूरजींचे पवित्र शीश श्री आनंदपूर साहिब येथे नेले, जे जगभरातील शीखांसाठी सर्वात पवित्र स्थळांपैकी एक आहे.

त्यांच्या बलिदानामुळे 'वसुधैव कुटुंबकम्' या तत्त्वावर आधारित प्राचीन सभ्यता आणि संस्कृती केवळ नष्ट होण्यापासून वाचली नाही, तर एक दृढ आणि सर्वसमावेशक राष्ट्र म्हणून उदयास येण्याच्या आपल्या सामूहिक प्रयत्नांमध्ये तो एक ऐतिहासिक टप्पा ठरला. शीख धर्माचा पाया हा मानवी इतिहासातील सामान्य विकास नव्हता, तर तो सर्व प्रकारच्या अत्याचारांविरुद्ध मानवतेची ढाल बनला. ही एक महान परंपरा होती आणि आजही आहे. नववे शीख गुरू श्री गुरु तेग बहादूरजींनी केवळ लोकांचा धर्मरक्षणाचा संकल्प जपला आणि बळकट केला नाही, तर शीख धर्माला महानतेच्या पुढील स्तरावर नेले.

श्री गुरु तेग बहादूरजींना माहीत होते की त्यांच्या भक्तांनी कोणताही पश्चात्ताप न करता धर्मासाठी किंमत मोजली. त्यांनी सर्व मोह नाकारले, सर्व वेदना आणि त्रास सहन केले, पण अश्रू ढाळले नाहीत. धर्मकार्यावरील त्यांची बांधिलकी आणि श्रद्धा अतूट होती. श्री गुरु तेग बहादूर यांचे जीवन हे धर्म आणि मानवजातीच्या कल्याणासाठी केलेल्या अतुलनीय बलिदानांचे सर्वोच्च उदाहरण आहे. औरंगजेबाच्या क्रूरतेपुढे त्यांनी कधीही शरणागती पत्करली नाही. प्रत्येक प्रश्नाला त्यांचे उत्तर स्पष्ट होते - मी शीख आहे आणि शीखच राहणार!

श्री गुरु तेग बहादूरजींच्या शिकवणीतून आणि त्यागातून आपल्याला अनेक आणि बहुआयामी धडे मिळतात. त्यांचा त्याग, सत्यावरील अढळ विश्वास, अहिंसा आणि सर्वांप्रती परोपकारी दृष्टीकोन आजही आपल्यासाठी प्रेरणादायी आहे. अंधश्रद्धा, जातीय भेदभाव आणि अस्पृश्यतेविरुद्ध त्यांनी संघर्ष केला, जेणेकरून प्रत्येक मानवाला आपल्या आवडीचे जीवन जगता येईल. धर्म हे सर्वांचे कर्तव्य आहे. खरा धर्म आपल्याला सर्वांशी चांगले वर्तन करण्याची आणि समाजाची शक्य तितकी सेवा करण्याची शिकवण देतो. त्यांनी दुर्बल आणि वंचितांच्या बाजूने ठामपणे उभे राहिले. त्यांचे पुत्र श्री गुरु गोविंद सिंगजी यांनी केवळ वडिलांची तत्त्वे आणि मूल्ये जपली नाहीत, तर खालसा निर्माण करून त्यांना पुढे नेले, जो धार्मिकता आणि न्यायासाठी लढण्याचे प्रतीक आहे.

आपण श्री गुरु तेग बहादूरजींचे हे महान वचन सदैव लक्षात ठेवले पाहिजे -"आपण आपले जीवन सुख-दुःखात तसेच मान-अपमानात समान भावनेने जगले पाहिजे." त्यांच्या शिकवणीतून जीवनाचा उद्देश तसेच समता, समरसता आणि त्याग यांचे महत्त्व अधोरेखित होते. श्री गुरु तेग बहादूरजींचे महान शब्द हे मानवतेसाठी ऊर्जा आणि ज्ञानाचे चिरंतन स्रोत आहेत. गुरूंच्या शब्दांच्या मधुर पठणाचा भक्तांवर खोल परिणाम होत असे. त्यांनी अत्यंत शांततापूर्ण आणि मानवतावादी मार्गाने निरंकुश व धर्मांध शासकाशी संघर्ष केला. त्यांची शिकवण कालातीत आहे आणि येणाऱ्या पिढ्यांना सदैव प्रेरणा देत राहील. श्री गुरु तेग बहादूर यांचे जीवन आपल्याला प्रत्येक परिस्थितीला शांततेने आणि खंबीरतेने सामोरे जाण्याची तसेच सौहार्द, न्याय, समता आणि समरसतेवर आधारित सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याची प्रेरणा देते.

# अजितदादांनी विमानाने जाण्याचा निर्णय का घेतला? प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे यांचे नाव घेत रोहित पवारांचा मोठा दावा काय?

मुंबई (दै. संध्या)

अजित पवार यांची अकाली एक्झिट राज्यातील प्रत्येकाच्या मनाला चटका लावून गेलेली आहे. त्यातच हा विमान अपघात आहे की घातपात यावरून मोठा गदारोळ उठला आहे. आमदार रोहित पवार यांनी घेतलेल्या दोन पत्रकार परिषदेत या सर्व घटनाक्रमावर सविस्तर भाष्य केले. त्यानंतर राष्ट्रवादीच्या काही नेत्यांनी त्यावर प्रतिक्रिया आणि वक्तव्य केली. त्यामुळे संशयाचा धूर अधिक गडद होत चालला आहे. अगदी थोड्यावेळापूर्वी रोहित पवार यांनी दिल्लीत माध्यमांशी संवाद साधला. पुन्हा एकदा याविषयावर भूमिका मांडली आहे. त्यामुळे गजहब उडाला आहे. जर 27 जानेवारी 2026 रोजी अजितदादा पुण्याला कारने गेले असते तर पुण्याला पोहचले आणि दुसऱ्या दिवशी बारामतीला गेले असते. तर मग ही दुर्दैवी घटना घडली नसती. 27 तारखेला ज्या ज्या गोष्टी घडल्या त्यावर मी अगोदर बोललो आहे. बैठकीला उशीर झाला. त्यानंतर कुणाचा फोन आला हे लोकांना आता कळालं आहे. फाईलवर मुद्दामहून तिथल्या तिथं स्वाक्षरी झाली पाहिजे अशी एका नेत्याने इच्छा व्यक्त केली. दादांनी ती स्वाक्षरी केली आणि संध्याकाळी 7.13 वाजता, विमानाचं बुकिंग झालं. जर दादांचं विमानाने जाण्याचा प्लॅन झाला असता तर 26 तारखेला संध्याकाळी अथवा 27 तारखेलाच दुपारी विमानाचं बुकिंग झालं असतं. जी काही क्रमवारी ती मी बोलून दाखवली. मी कुणावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केलेलं नाही. माझं प्रामाणिक मत आहे की या सर्व गोष्टींची चौकशी व्हायला हवी. 27 तारेखापासून ते 28 तारखेपर्यंत चौकशी व्हायला पाहिजे. तर जे प्रमुख पायलट होते. ते कुणाला भेटले. महिनाभर आणि दोन महिन्याभर कुणाच्या संपर्कात होते, कुणाला भेटले होते याची सुद्धा चौकशी व्हायला हवी अशी मागणी रोहित पवार यांनी केली. प्रमोदराव हिंदूराव यांनी जी माहिती दिली, याचा अर्थ मी कुठंही खोटं बोललो नाही हे समोर येत आहे. जसं की 27 तारखेला तटकरे यांनी स्वतः सांगितले की तिथं स्वतः आलो, उशीरापर्यंत थांबलो. दुसऱ्या बाजूला प्रफुल्ल पटेल यांचा फोन आला असे हिंदूराव सांगत आहेत. आणि मग उशीरा झाला. याचा अर्थ दोन गोष्टी जर खऱ्या असतील तर तिसरी गोष्ट पण तितकीच खरी आहे. एका पॉलिटिकल कन्स्लटन्शीबाबत तिथं चर्चा झाली. योगायोग असा आहे की या पॉलिटिकल कन्स्टलन्शीने विमान सुद्धा विकत घेतलं आहे. आता त्या व्यक्तीचा शेकडो कोटींचा कॉन्ट्रक्ट कॅन्सल करण्यासाठी दादांची भूमिका होती. कदाचित त्यामुळे वाद विवाद झाला. सुनील तटकरे हे त्यावेळी तिथं होते. त्यामुळे दादांना उशीर झाला. उशीर झाला म्हणून दादा गाडीने जाण्याऐवजी विमानाने गेले असे रोहित पवार म्हणाले. नरेश अरोरा यांना केवळ सर्व्हे पुरते ठेवा. मी काही कन्स्टलन्शीच्या माध्यमातून पक्ष चालवत नाही असे दादा म्हणाले होते, या चर्चेवर रोहित पवार यांनी भावना व्यक्त केल्या. याविषयीची जी माहिती समोर येत आहे ती खरी आहे. आम्ही जेव्हा बारामतीमध्ये दादांसोबत होतो. त्यावेळी सुद्धा नरेश अरोरा यांच्या कन्स्टलन्सीच्या लोकांना दादांनी त्यांच्या स्टाईलमध्ये झापत होते. 27 तारखेला सुद्धा नरेश अरोरा याचा शेकडो कोटींचा कॉन्ट्रक्ट तसाच ठेवला पाहिजे, त्याला रक्कम द्यायला हवी अशी भूमिका काही ठराविक नेत्यांची होती.

# 'मुंबई क्लायमेट वीक' : हवामान कृतीसाठी भारताचा जागतिक मंच

मुंबईत होणारा भारतातील पहिला 'क्लायमेट वीक' हा हवामान बदलावर केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष कृतीकडे नेणारा मंच ठरणार आहे. शासन, उद्योग, तज्ज्ञ, युवक आणि नागरिक यांना एकत्र आणत हा उपक्रम ग्लोबल साऊथ देशांसाठी हवामान नेतृत्वाचा नवा नमुना मांडणार आहे.

नंदकुमार बलभीम वाघमारे
वरिष्ठ सहायक संचालक (माहिती)
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई

अन्नसुरक्षा, स्वच्छ ऊर्जा आणि शहरी शाश्वतता या तीन महत्त्वाच्या क्षेत्रांवर भर देत नवकल्पना, युवक सहभाग आणि लोकाभिमुख कार्यक्रमांद्वारे हवामान कृती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. हवामान बदलावर उपाय म्हणजे सामूहिक जबाबदारी आणि तातडीची कृती हा यानिमित्ताने मुंबईतून दिला जाणारा संदेश स्पष्ट आहे....

हवामान बदल ही भविष्यातील किंवा केवळ वैज्ञानिक चर्चेची गोष्ट राहिलेली नाही. पूर, उष्णतेच्या लाटा, अनियमित पाऊस, अन्नसुरक्षेची आव्हाने या सगळ्याचा थेट परिणाम आपल्या दैनंदिन आयुष्यावर होत आहे. अशा पार्श्वभूमीवर मुंबईत १७ ते १९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान होणारा मुंबई क्लायमेट वीक (MCW) हा भारतासाठी आणि विशेषतः ग्लोबल साऊथ देशांसाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

हा केवळ परिषदांचा कार्यक्रम नाही, तर संवादातून प्रत्यक्ष कृतीकडे जाण्याचा प्रयत्न आहे आणि त्याचे वैशिष्ट्य म्हणजे शासन, उद्योग, तज्ज्ञ, युवक आणि सामान्य नागरिक यांना एकाच मंचावर आणणे हे आहे.

प्रोजेक्ट मुंबई या संस्थेच्या वतीने हा उपक्रम आयोजित करण्यात आला असून महाराष्ट्र शासनाचा पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या सहकार्याने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे मुंबईला भारत तसेच इतर ग्लोबल साऊथमधील शहरांसाठी हवामान उपाययोजनांची प्रयोगशाळा होणार आहे.

मुंबई क्लायमेट वीकचा उद्देश केवळ हवामान बदलावर चर्चा करणे नसून, प्रत्यक्ष अंमलात आणता येतील असे उपाय शोधणे आणि त्यांना गती देणे हा आहे. मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे तीन दिवस मुख्य कार्यक्रम होतील, तर मुंबई शहरभर महाविद्यालये, समुदाय केंद्रे आणि सांस्कृतिक संस्थांमध्ये विविध उपक्रम राबवले जातील. त्यामध्ये नेतृत्व संवाद, विविध विषयांवरील ट्रॅक्स, MCW इनोव्हेशन चॅलेंज, यूथ ग्रीन इनोव्हेशन चॅलेंज तसेच उपाययोजनांचे प्रदर्शन क्षेत्र आदींचा समावेश असणार आहे.

"हब-अँड-स्पोक" रचना म्हणजे एकाच वेळी धोरणात्मक चर्चा आणि लोकसहभाग दोन्ही गोष्टी साध्य करण्याचा प्रयत्न या निमित्ताने होणार आहे. हवामान कृती ही केवळ सरकारची जबाबदारी नसून समाजाच्या प्रत्येक घटकाचा सहभाग आवश्यक आहे, हा संदेश यातून दिला जाणार आहे.

मुख्य केंद्रातील पहिल्या दिवशी अर्थशॉट प्राईज या आंतरराष्ट्रीय उपक्रमाचे विशेष सत्र होणार असून, या सत्रात निसर्ग, अन्न प्रणाली आणि मानव यांवर लक्ष केंद्रित केले जाईल. केन्सिंग्टन पॅलेस (यूके) येथील पथकाच्या मार्गदर्शनाखाली होणारा हा उपक्रम प्रिन्स विल्यम यांच्या संकल्पनेतून साकारलेला असून, मुंबई क्लायमेट वीकमध्ये तो प्रथमच आणि विशेष स्वरूपात सादर केला जाणार आहे. या कार्यक्रमात ग्लोबल साऊथमधील हवामान नवोन्मेषक, प्रत्यक्ष उपाययोजना राबवणारे कार्यकर्ते तसेच भारतातील अग्रगण्य व्यक्ती सहभागी होणार असून, मोठ्या प्रमाणावर जनसहभाग वाढवण्याचा उद्देश आहे. याच कालावधीत विविध महाविद्यालये, वसाहती आणि सांस्कृतिक संस्थांमध्ये विविध कार्यक्रम होणार असून, त्यात रोड शो, कला व माध्यम उपक्रम तसेच सस्टेनेबिलिटी मेला यांचा समावेश आहे. या उपक्रमांद्वारे हवामान कृती दैनंदिन जीवनाचा भाग बनवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

वातावरण हे मुंबई क्लायमेट विकचे नागरिक संवाद व्यासपीठ असून, याद्वारे नागरिकांना त्यांच्या हवामानविषयक मतांची मुक्त आणि अनफिल्टर्ड मांडणी करता येणार आहे. भाषणे, कविता, कथा, गाणी आणि इतर सर्जनशील माध्यमांद्वारे हवामानाशी संबंधित दैनंदिन अनुभव आणि मते मुंबई क्लायमेट वीकच्या केंद्रस्थानी आणल्या जाणार आहेत.

हवामान बदलाचा सर्वाधिक परिणाम विकसनशील देशांवर होतो, परंतु उपाययोजनांच्या चर्चेत त्यांना कमी महत्त्व मिळते. मुंबई क्लायमेट वीक ग्लोबल साऊथ देशांसाठी एक नेतृत्व मंच उपलब्ध करून देणार आहे. मुंबई क्लायमेट वीक व्यापक भागीदारीच्या माध्यमातून राबवण्यात येत आहे. आयडीएफसी फर्स्ट बँक हा मुख्य भागीदार आहे. डेलॉईट ही धोरणात्मक ज्ञान भागीदार संस्था आहे. टाटा सामाजिक विज्ञान संस्था (टीआयएसएस) आणि आयआयटी बॉम्बे हे शैक्षणिक भागीदार आहेत.

एव्हरसोर्स कॅपिटल, इंडिया क्लायमेट कोलॅबोरेटिव्ह, शक्ती सस्टेनेबल एनर्जी फाउंडेशन, वर्ल्ड रिसोर्सेस इन्स्टिट्यूट (WRI) इंडिया, क्लायमेट ग्रुप, सी 40, महिंद्रा ग्रुप, इंडियन मर्चंट्स चेंबर यांसारख्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांचा सहभाग असणार आहे. युनिसेफच्या युवाह (YuWaah!) या उपक्रमाद्वारे युवक सहभाग भागीदार असणार आहे.

या उपक्रमात 30 हून अधिक देशांतील प्रतिनिधी, आंतरराष्ट्रीय संस्था, वित्तीय संघटना आणि उद्योग क्षेत्रातील नेते सहभागी होणार आहेत. बिल गेट्स, हिलरी क्लिंटन यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, उद्योगपती आणि नेते यांची उपस्थिती या कार्यक्रमाला जागतिक महत्त्व देते. यातून भारत हवामान विषयक नेतृत्व केवळ धोरण पातळीवर नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून दाखवण्याचा प्रयत्न करत आहे.

तीन महत्त्वाचे केंद्रबिंदू मुंबई क्लायमेट वीकची संकल्पना तीन प्रमुख क्षेत्रांवर आधारित आहे:

१. अन्नप्रणाली (Food Systems) – हवामान बदलाचा शेती आणि अन्नसुरक्षेवर होणारा परिणाम लक्षात घेऊन टिकाऊ शेती आणि पोषण यावर भर.
२. ऊर्जा संक्रमण (Energy Transition) – पारंपरिक ऊर्जेऐवजी स्वच्छ आणि नवीकरणीय ऊर्जेकडे वाटचाल.
३. शहरी शाश्वतता (Urban Resilience) — शहरांना हवामान बदलाच्या परिणामांपासून सुरक्षित आणि सक्षम बनवणे.

हे तीनही घटक भारताच्या विकासाच्या केंद्रस्थानी आहेत, त्यामुळे हा कार्यक्रम केवळ पर्यावरण विषयापुरता मर्यादित राहणार नाही.

## हवामान कृतीचे नवे मॉडेल

मुंबई क्लायमेट वीक ही भारत आणि ग्लोबल साऊथ देशाच्या नेतृत्वाखालील, नागरिक-केंद्रित हवामान कृतीचे नवे मॉडेल ठरणार आहे. मुंबई क्लायमेट वीक हा सार्वजनिक-खासगी-नागरिक भागीदारीवर आधारित उपक्रम आहे. यामधून शहर पातळीवर हवामान उपाययोजना राबविण्याचा भारतीय नमुना साकारणार आहे. जर या मंचातून ठोस भागीदारी, निधी आणि धोरणात्मक निर्णय घडले, तर तो भारत आणि ग्लोबल साऊथ देशांसाठी दिशादर्शक ठरू शकतो. हवामान बदल हा भविष्यातील नव्हे, तर वर्तमानाचा प्रश्न आहे. मुंबई क्लायमेट वीक हा या वास्तवाला सामोरे जाण्याचा सामूहिक प्रयत्न असून जिथे कल्पना, विज्ञान, उद्योग आणि नागरिक सहभाग एकत्र असेल. हवामान कृती ही सर्वांची जबाबदारी आहे, आणि बदलाची सुरुवात आजपासूनच करावी लागेल, हा संदेश मुंबई क्लायमेट विकच्या माध्यमातून जगभरात जाईल हे नक्की.

## नवकल्पना आणि युवकांची भूमिका

मुंबई क्लायमेट वीकमध्ये नवोन्मेष हा केंद्रस्थानी असणार आहे. हवामान समस्यांवर नवे उपाय शोधण्यासाठी नॅशनल स्टॉक एक्स्चेंजच्या सहकार्याने 'इनोव्हेशन चॅलेंज' आयोजित करण्यात येणार आहे. स्टार्टअप, संशोधक आणि सामाजिक संस्था हे यामध्ये सहभागी होऊन आपले उपाय सादर करणार आहेत. युवकांसाठी स्वतंत्र हरित नवकल्पना स्पर्धा असेल. युनिसेफच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष चर्चेत आणि उपाययोजनांमध्ये सहभागी केले जाणार आहे. भविष्यातील हवामान नेतृत्व घडवण्यासाठी हा महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो.

## विज्ञान, संस्कृती आणि नागरिक सहभाग

मुंबई क्लायमेट वीकमध्ये नवोन्मेष हा केंद्रस्थानी असणार आहे. या सप्ताहात सार्वजनिक व्याख्याने, कला-संस्कृती कार्यक्रम, चित्रपट प्रदर्शन आणि नागरिक कार्यशाळा आयोजित केल्या जातील. हवामान बदल हा केवळ वैज्ञानिक विषय नसून सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्नही आहे, हे यातून अधोरेखित होते. 18 फेब्रुवारी रोजी विशेष सत्रात भारताचे अंतराळवीर राकेश शर्मा आणि अंतराळवीर शुभांशु शुक्ला (दोघेही अशोक चक्र पुरस्कारप्राप्त) शालेय विद्यार्थ्यांशी तसेच जागतिक नेतृत्वाशी संवाद साधणार असून, अंतराळ संशोधन, विज्ञान आणि हवामान जबाबदारी यांचा परस्पर संबंध अधोरेखित केला जाणार आहे. युनिसेफ (UNICEF) इंडिया आणि यु वाह (YuWaah) यांच्या भागीदारीत युवकांसाठी विशेष उपक्रम राबवले जाणार असून, 16 ते 24 वयोगटातील युवकांचा सहभाग असणार आहे. अन्न प्रणाली, ऊर्जा संक्रमण आणि शहरी लवचिकता या विषयांवरील युवकांच्या नवोन्मेषांचे प्रदर्शन मुंबई क्लायमेट वीकमध्ये करण्यात येणार आहे.

# पुण्यात आरटीओच्या बनावट चलनाद्वारे व्यावसायिकाची सायबर फसवणूक; तीन लाखांचा गंडा

**पुणे (दै. संध्या)**

पुणे : वाहतूक नियमभंग केल्याबाबत प्रादेशिक परिवहन विभागाचे (आरटीओ) बनावट चलन पाठवून सायबर चोरट्यांनी एका व्यावसायिकाची दोन लाख ९५ हजार रुपयांची ऑनलाइन फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी मार्केट यार्ड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी व्यावसायिक (वय ४७) मार्केट यार्ड परिसरातील वर्धमानपुरा सोसायटीत राहतात. सायबर चोरट्यांनी त्यांना वाहतूक नियमभंगाचे कथित चलन एपीके फाईलच्या माध्यमातून पाठविले. संबंधित चलनावर आरटीओचा उल्लेख असल्याने त्यांनी ती फाइल उघडली. फाइल उघडल्यानंतर त्यात वाहनाची माहिती आणि दंडाची रक्कम दिली होती. सुरुवातीला चोरट्यांनी त्यांना दहा रुपये भरून पुढील दंडाची रक्कम जमा करण्यास सांगितले. त्यानंतर विविध कारणे देत बँक खात्याची गोपनीय माहिती घेतली. त्या माहितीच्या आधारे चोरट्यांनी व्यावसायिकाच्या बँक खात्यातून दोन लाख ९५ हजार रुपये काढून घेतले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर व्यावसायिकाने मार्केट यार्ड पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञात सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, वाहतूक नियमभंगाचे बनावट चलन, थकीत वीज देयक किंवा एमएनजीएल गॅस बिलाच्या नावाखाली एपीके फाइल अथवा लिंक पाठवून फसवणूक करण्याचे प्रकार अलीकडे वाढले आहेत. नागरिकांनी अनोळखी मोबाईल क्रमांकावरून आलेल्या फाइल किंवा लिंक उघडू नयेत.



# पुणे जिल्हा नियोजन समिती बैठकीत दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रध्दांजली

**पुणे (दै. संध्या)**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना विधानभवन येथे आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुनेत्रा पवार होत्या.

यावेळी क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार अमित गोरखे भीमराव तापकीर, राहुल कुल,सिद्धार्थ शिरोळे, बापूसाहेब पठारे, बाबाजी काळे, शंकर मांडेकर, हेमंत रासणे, सुनील शेळके,शंकर जगताप, पुणे शहराचे महापौर मंजुषा नागपुरे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पिंपरी-चिंचवड मनपा आयुक्त श्रावण हर्डीकर, पीएमआरडीएचे मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश म्हसे, पुणे मनपा अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., पिंपरी-चिंचवडचे पोलीस सह आयुक्त शशिकांत महावरकर, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता राजेंद्र राहणे, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, खासदार डॉ. अमोल कोल्हे, आमदार शरद सोनवणे, पालक सचिव व्ही. राधा, उपमुख्यमंत्री यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पुणे शहरचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

श्री. पाटील म्हणाले, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार हे आपल्या कार्यपद्धतील सुक्ष्म अभ्यासातून भविष्याचा वेध घेण्याचा आग्रह करणारे व्यक्तीमत्व होते. राज्याच्या प्रगतीत त्यांचे फार मोठे योगदान होते. जिल्हा नियोजन समितीची बैठक खऱ्याअर्थाने वेळेत सुरु करुन त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे, अशा शब्दात श्री. पाटील यांनी आपले विचार व्यक्त केले.

श्री. भरणे म्हणाले, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने राज्यासह पुणे जिल्ह्याचे नुकसान झाले असून त्यांची पोकळी न भरुन निघणारी आहे. राज्यासह पुणे जिल्हयाची प्रगती करुन सर्व क्षेत्रात पुढे जावे हा त्याचा मानस होता, त्यादृष्टीने सर्वांना सोबत घेवून त्यांना न्याय देण्याची त्यांची भुमिका होती. पायाभूत विकासाच्यादृष्टीने त्याचे आदर्श, विचार, कार्यपद्धती डोळ्यासमोर ठेवून तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्याचा प्रगतीचा आलेख पुढे नेण्याकरिता सर्वांनी प्रयत्न करुया, अशा शब्दात श्री. भरणे यांनी आपले विचार व्यक्त केले.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री, पालकमंत्री तसेच विरोधी पक्षनेता अशा विविध भुमिकेत आपली जबाबदारी पार पाडली, त्यांच्या मार्गदर्शनाखाली लोकप्रतिनिधी व प्रशासनाच्या समन्वयाने कामे करीत असतांना विविध विकास मार्गी लागले.

















